


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २१९ ■ रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# राज्यात 'टिपू सुलतान'च्या नावावरून ठिणगी !

**सत्ताधारी भाजपप्रणीत शहर सुधार आघाडी आता 'तो' वादग्रस्त फलक उखडून फेकणार का ?**

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोला :** राज्यात छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांच्या तुलनेवरून रान पेटलेले असताना आता अकोला महानगरपालिकेतील 'टिपू सुलतान स्थायी समिती सभागृह' हे नाव राजकीय वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. 'ज्या टिपू सुलतानच्या नावावरून मुख्यमंत्री आणि भाजप आक्रमक आहे, त्याच नावाचा फलक अकोला मनपाच्या छाताडावर मिरवतोय कसा ?' असा जळजळीत सवाल आता विचारला जात आहे.'बाहेर आंदोलने करून टिपू सुलतानचा निषेध करायचा आणि महापालिकेत मात्र त्याच्याच नावाने सभागृह चालवायचे, हा दुटप्पीपणा आता थांबायला हवा. भाजपने त्वरित हा ठराव रद्द करून नाव बदलण्याची हिंमत दाखवावी!'

### सत्ताधारी 'शहर सुधार आघाडी'ची दातखिळी का बसली?

अकोल्यात भाजपप्रणीत शहर सुधार आघाडीची सत्ता आहे. हिंदुत्वाच्या मुद्द्यावर रान पेटवणारी भाजप, आपल्याच नाकाखाली असलेल्या स्थायी समिती सभागृहाचे 'टिपू सुलतान' हे नाव बदलण्याचे धाडस दाखवणार का ?. हा ठराव आणणारे पांढरपेशी कोण आणि त्याला मूक संमती देणारे कोण, याचा हिशोब आता अकोलेकर मागत आहेत.

### मुख्यमंत्र्यांचा आक्षेप; मग अकोल्यात 'मवाळ' धोरण का?

काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी टिपू सुलतानची तुलना शिवरायांशी केल्यानंतर खुद्द मुख्यमंत्र्यांनी कडक शब्दांत समाचार घेतला. जर राज्याचे नेतृत्व या मुद्द्यावर इतके आक्रमक असेल, तर अकोल्यातील भाजपचे स्थानिक शिलेदार या 'वादग्रस्त' नावाचा ठराव रद्द करण्यासाठी कच खात आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.




## काँग्रेस प्रदेशाध्यक्षांच्या 'त्या' वक्तव्याचा तीव्र निषेध

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोला :** छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करून महाराष्ट्राच्या अस्मितेचा अपमान करणाऱ्या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याविरोधात आज अकोल्यात भाजपने आक्रमक पवित्रा घेतला. स्थानिक नवीन बस स्टँडसमोर भाजपच्या वतीने प्रचंड निदर्शने करण्यात आली. यावेळी सपकाळ यांच्या निषेधाच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना एका धर्मांध राजवटीच्या टिपू सुलतानशी केल्याचा प्रकार म्हणजे त्यांचे केवळ ऐतिहासिक अज्ञान नसून, तो जाणीवपूर्वक केलेला महाराष्ट्राच्या अस्मितेवरचा घाला आहे, असा घणाघात भाजप नेत्यांनी केला.




'जगाचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांची तुलना कोणाशीही होऊ शकत नाही,' अशा शब्दांत आंदोलकांनी आपला रोष व्यक्त केला.या आंदोलनाचे नेतृत्व खासदार अनुप धोत्रे, जयंतराव मसने, महापौर शारदाताई खेडकर , गटनेता पवन महल्ले यांनी केले.'शिवराय आमचे दैवत आहेत आणि त्यांचा अपमान करणाऱ्यांना महाराष्ट्र कधीच माफ करणार नाही. काँग्रेसने तुष्टीकरणाच्या राजकारणासाठी इतिहासाची मोडतोड थांबवावी, अन्यथा यापुढील आंदोलन अधिक तीव्र असेल.या आंदोलनाचे नियोजन व समन्वय भाजप महानगर सरचिटणीस ॲड. देवाशिष काकड यांनी केले होते.

### भाजप विरोधात काँग्रेस नेत्यांची चुप्पी का

◆ भाजपने आज टिपू सुलतान प्रकरणात जोरदार आंदोलन करत काँग्रेस प्रदेशाध्यक्षाच्या वक्तव्याचा निषेध केला. पण, असे होत असताना अकोल्यातील काँग्रेस नेत्यांची चुप्पी अधोरेखित होणारी होती. त्याच बरोबर काँग्रेसच्या एका ही बड्या नेत्यांनी या विषयावर प्रतिक्रिया दिली नाही. काँग्रेसचे आमदार, काँग्रेस जिल्हाध्यक्ष, महानगरअध्यक्ष, काँग्रेसचे विविध प्रवक्ते आणि काँग्रेसचे माजी आमदार व लोक प्रतिनिधींची चुप्पी अधोरेखित करणारी होती.


## पाकिस्तान टिपू सुलतानाला नायक मानतो

**◆ मग त्यांच्याशी क्रिकेट खेळता कसे : राऊतांचा भाजपवर हल्लाबोल**

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**मुंबई :** ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पाकिस्तानसोबतच्या क्रिकेट सामन्यांवरून भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. पाकिस्तानमध्ये टिपू सुलतानाला नायक आणि महान योद्धा मानले जाते. अशा देशासोबत भारत क्रिकेट खेळत असेल, तर देवेंद्र फडणवीस आणि भाजपने त्याचाही निषेध केला पाहिजे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आम्ही पाकिस्तानसोबत क्रिकेटचा धिक्कार करतो, असे फडणवीस आणि भाजपच्या नेत्यांनी सांगायला पाहिजे पण ते तसे म्हणणार नाही ते ढोंगी आहेत.

अकोला महानगरपालिका स्थायी समिती सभागृहाचे नाव 'शहीदे वतन शेरे म्हैसूर टिपू सुलतान' ठेवण्याचा ठराव भाजपानेच मांडला. सूचक हे माजी महापौर व सध्याचे भाजपाचे अकोला महानगर निवडणूक प्रमुख व माजी महानगर भाजप अध्यक्ष विजय अग्रवाल हे होते. अशी जळजळीत टिका काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी केली आहे. त्यांनी थेट एक्स अकाऊंटवर विजय अग्रवाल यांच्या नावाच्या ठरावाचे पत्र टाकून राज्यात खळबळ उडवून दिली आहे. त्यामुळे भाजप बॅक फुटवर जाण्याची चिन्हं निर्माण झाली आहे.



## अकोला शिक्षण विभागात 'टक्केवारी'चा बाजार

**शिक्षकांच्या घामाच्या पैशावर डल्ला मारणारा तो 'महाभ्रष्ट' दलाल कोण ?**

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोला :** जिल्ह्यातील शिक्षण विभाग आता भ्रष्टाचाराचा अड्डा बनला असून, शेकडो शिक्षकांच्या हक्काच्या वेतनाचा फरक अडवून धरण्याचा संतापजनक प्रकार उघडकीस येत आहे. 'फाईलवर वजन ठेवा, अन्यथा फाईल हलणार नाही' या अघोरी सूत्रानुसार अकोल्याच्या शिक्षण विभागात लूट सुरू आहे. विशेष म्हणजे, मंजूर रकमेच्या १० टक्के लाचेची मागणी उघडपणे केली जात असतानाही शिक्षक संघटनांनी ओढलेली 'मौनव्रत' संशयाच्या भोवऱ्यात आहे.

अकोला शिक्षण विभागात सध्या एका ठराविक दलालाची जोरदार चर्चा आहे. शिक्षकांच्या वेतन फरकाची लाखो रुपयांची रक्कम कोषागारात पडून असताना, ती देण्यासाठी १० टक्क्यांची 'कट प्रॅक्टिस' राबवली जात आहे. जोपर्यंत या दलालाचा खिसा गरम होत नाही, तोपर्यंत शिक्षकांच्या फाईल्सवर धुळ बसत पडली आहे. स्वतःच्या हक्काच्या पैशासाठी शिक्षकांना या भ्रष्ट व्यवस्थेसमोर लोटांगण घालावे लागत आहे.

अकोल्यातील शेकडो शिक्षकांच्या वेतन फरकाची लाखोंची रक्कम देण्यास टाळाटाळ करणारे अधिकारी कोण असा प्रश्न विचारला जात आहे. शिक्षक जो पर्यंत या दलालांना दहा टक्के देत नाही तो पर्यंत वेतन फरकाची लाखोंची रक्कम थांबविण्यात मागे शिक्षणाधिकारी विभागातील तो अधिकारी कोण अशी विचारणा होत आहे.

### संघटनांची 'लाचारी' की 'भागीदारी'?

एकीकडे शिक्षकांची लूट होत असताना, दुसरीकडे स्वतःला शिक्षकांचे कैवारी म्हणवणाऱ्या शिक्षक संघटना, संस्थाचालक आणि शिक्षक लोकप्रतिनिधींनी तोंडावर बोट ठेवले आहे. ही 'चुप्पी' म्हणजे या भ्रष्ट साखळीत त्यांचीही भागीदारी आहे का? असा जळजळीत प्रश्न आता सामान्य शिक्षक विचारत आहेत. शिक्षकांच्या हक्कावर डल्ला मारला जात असताना हे नेते नेमके कोणाचे हित जोपासत आहेत. शिक्षण विभागात सुरु असलेला हा उघड भ्रष्टाचार आता वरिष्ठ कार्यालयापर्यंत पोहोचला आहे. शिक्षण उपसंचालकांनी याची तातडीने दखल घेऊन चौकशी न केल्यास, येत्या काही दिवसांत अकोल्यातील एखादा बडा अधिकारी किंवा त्याचा हस्तक पावडर लावलेल्या नोटांनिशी रंगेहात पकडला जाण्याची दाट शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, अकोल्याबाहेरील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पथक या भ्रष्ट टोळीवर 'वॉच' ठेवून आहे.

## अमरावतीत पाच न्यायाधीश आणि चार न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या घरी रात्री चोरी



प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अमरावती :** कांतानगर मध्ये अती सुरक्षित अशा भागात पाच न्यायाधीश आणि चार न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानी शनिवारी रात्री चोरी झाली. नलदमयंती आणि शहानुर अपार्टमेंट मध्ये चोरी करून लाखोंचा मुद्देमाल लंपास केल्याची माहिती आहे.

रात्री पोलीस बंदोबस्त असताना देखील चोरांनी शिरकाव केल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून या घटनेची माहिती मिळताच डीसीपी शिंदे यांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची माहिती घेतली. दोन दिवसांपूर्वी अमरावतीमध्ये एका सुवर्णकाराला लुटल्याची घटना ताजी असतानाच आता न्यायाधीशांची घरी फोडल्याचा समोर आला आहे. बाहेरगावी गेलेल्या न्यायाधीशांच्या घरी चोरट्यांनी लक्ष केल्याने खळबळ उडाली आहे. पोलिसांकडून चोरट्यांचा शोध सुरू असून पोलीसां कडून परिसरातील सर्व सीसीटीव्ही तपासले जाणार आहे.

**सुचना**

सर्व एजंट, प्रतिनिधी, वाचक, यांना कळविण्यात येते की, दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजा महाशिवरात्री (पारणे) दिनानिमित्त दै. सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालयाला सुट्टी राहणार आहे. त्यामुळे दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.


- वितरण व्यवस्थापक

## नरनाळा महोत्सवासाठी गजानन महाराज सजल विहीर परिसर सजला, देखणी तयारी

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोट :** अकोली जहागिर येथे संत श्री गजानन महाराजांनी धावा केल्यामुळे सजल झालेल्या पवित्र विहिरीच्या सान्निध्यात आजपासून नरनाळा महोत्सव साजरा होणार आहे. यासाठी मंडप डेकोरेशन, भव्य स्टेज, बसण्यासाठी खुर्च्यांसहित व्यवस्था व स्टॉल उभारण्यात आले आहे.

रविवारी दुपारी ४.३० वाजता राज्याचे कामगार तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. ऐतिहासिक नरनाळा किल्ला आणि परिसरातील वनसंपदा निसर्ग प्रेमींना न्याहाळता यावी या दृष्टीने भव्य आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, वन विभागाचे अधिकारी संपूर्ण तयारीकडे लक्ष ठेवून आहेत. सकाळ पासून रात्री उशिरापर्यंत विविध कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली तयारी पूर्ण झाली आहे. कोणत्याही प्रकारची उणीव राहणार नाही याचा आढावा घेतला जातो आहे. या भागात पर्यटनाला चालना मिळावी तसेच मनोरंजन व्हावे अशी आखणी करण्यात आली आहे. कवी संमेलन, कैलास खेर यांचे लाईव्ह कन्सर्ट, चला हवा येऊ द्या मधील कलावंतांचे सादरीकरण तसेच विविध खाद्यपदार्थ याठिकाणी उपलब्ध राहणार आहेत. मधल्या काळात नरनाळा महोत्सवाला ब्रेक लागला होता. परंतु आता पुन्हा नव्या दमाने तसेच अतिशय उत्साहाने १५ ते १७ फेब्रुवारी दरम्यान होणारा नरनाळा महोत्सव छाप पाडणारा राहावा असे भव्य आयोजन केले आहे. पर्यटकांनी तिन्ही दिवसांच्या भरगच्च कार्यक्रमांना साथ द्यावी. मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.











## अडगावात माफियांच्या मदतीला धावणारा 'ज्ञानेश्वर' कोण

**◆ डिजेल व गुटखा माफियांना वाचविण्यामागे कोणाचा हात**

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोला :** वन विभागांच्या जमीनीत खोदकाम करण्यात माहिर असलेला 'ज्ञानेश्वर' कोण असा प्रश्न अडगावात विचारला जात आहे. अडगाव आगीत तिघा निष्पापांचा जीव जाण्यात व डिजेल च्या अवैध धंद्यांना याच ज्ञानेश्वरचा आशिर्वाद होता. त्यावर पोलिस दलातून कारवाई का होत नाही अशी विचारणा होत आहे. तडीपारांना आश्रय देणारा, रेती माफियांचे तळवे चाटणारा तो कोण अशी विचारणा आता होत आहे. दरम्यान, हिवरखेड पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा आगीच्या प्रकरणात दाखल केला आहे. या प्रकरणात इब्राहिम शेख याला अटक केल्याची माहिती मिळाली.

अडगाव येथे तिघांचा भीषण आगीत होरपळून मृत्यू झाला. पण, या तिघांना न्याय मिळण्याची शक्यता धुसर असल्याची चर्चा ग्रामीण भागात आहे. वन विभागांच्या जमीनीत खोदकाम करणे, रेती माफियांना साथ देणे, जमीनी बळकाविणाऱ्यांना बळ देणे, गरिब शेतकऱ्यांच्या शेतीवर डल्ला मारणे, तडिपारांना अडगावात आश्रय देणे, गौण खनिज चोरांना मदत करणे, प्रत्येक कामात सटेलमेंट करणे असे उद्योग अडगावात सुरु आहे. याच उद्योगातून अवैध गुटखा माफिया आणि डिजेल माफियांना अडगावात मोठा करणारा ज्ञानेश्वर कोण अशी विचारणा होत आहे. अडगावातील तिघा निष्पापांचा जीव अवैध डिजेल माफियांमुळे गेला आहे. या गुटखा आणि डिझेल माफियांचा पार्टनर असलेला ज्ञानेश्वर कोण अशी विचारणा आता होत आहे. डिजेलचा अवैध साठ्याची माहिती अडगाव पोलिसांना का नव्हती. जर होती तर वेळीच कारवाई का केल्या गेली नाही. अशी विचारणा पोलिस दलात सुरु आहे. अडगाव कडे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे तर डिजेलचा भडका उडाला नाही ना अशी विचारणा आता होत आहे. जिल्ह्यात असे किती डिझेलचे अवैध साठे आहे आणि त्यांना कोणा कोणाचा आशिर्वाद आहे याची खातरजमा एस पींनी करण्याची गरज आहे. डिजेलच्या आगीच्या ज्वाळांमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या स्वरा आणि तिच्या आजी व मामांना खरी श्रध्दांजली ठरेल.





**संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्था म. पुसद**

**रजि.नं. वायएमएल / ( वायएमएल । आरएसआर / सीआर .)१२४/ २००७.२००८.**
**कार्यालय - सुरदीर्घिका कॉम्प्लेक्स, बस स्थानक जवळ, सीमा झेरोक्स समोर पुसद**

**पाहिजेत**

पतसंस्थेच्या वाशिम, मालेगाव, रिसोड व अनसिंग शाखेतील खालील पदे मानधन तत्वावर भरण्यात येणार आहेत.

| अ.क्र | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| ०१ | शाखा व्यवस्थापक (पुरुष) | ०४ | बी.कॉम / एम कॉम /पदवीधर, कॉम्पुटर टायपिंग, बँक, पतसंस्थेचा तीन वर्ष कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| ०२ | लिपिक | ०४ | बी.कॉम / एम कॉम / पदवीधर कॉम्पुटर टायपिंग बँक, पतसंस्था कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| ०३ | सेवक (पुरुष) | ०४ | इ. दहावी, बारावी / पदवीधर |
| ०४ | दैनिक अल्पबचत वसुली प्रतिनिधी | १२ | इ. दहावी, बारावी / पदवीधर |

**टीप :-** पतसंस्थेच्या जिल्ह्यातील कोणत्याही शाखेत काम करण्याची तयारी असावी.
इच्छुक उमेदवारांनी मूळ कागदपत्रासह स्वखर्चाने दि. २२/०२/२०२६ रोज रविवार सकाळा ११:०० ते ०३:०० वाजेपर्यंत उपस्थित राहावे.
**मुलाखत स्थळ :-** महालक्ष्मी कॉम्प्लेक्स-२ केंदळे पेट्रोल पंपाच्या बाजुला वाशिम जि.वाशिम संपर्क- ९८५०९९२३१४

अध्यक्ष
**आत्माराम जाधव**
संत सावता माळी नागरी सह. पतसंस्था पुसद

सिटी न्यूज अमरावती
रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# ४ फेब्रुवारी ते ५ मार्च दरम्यान पाच जिल्ह्यांत रेशीम शेतीसाठी व्यापक जनजागृती

**अमरावती :** शेतकऱ्यांना हमखास व शाश्वत उत्पन्न देणाऱ्या रेशीम शेतीचा विस्तार व्हावा, तसेच रेशीम उद्योगाबाबत व्यापक जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने राज्य शासनाच्या मान्यतेने अमरावती विभागात ‘महारेशीम अभियान–२०२६’ राबविण्यात येणार आहे. हे अभियान दि. ४ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा या पाच जिल्ह्यांत राबविले जाणार आहे. या अभियानातून ‘रेशीम शेतीचे फायदे व शासनाच्या योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली जाणर आहे. असे रेशीम विभागाव्दारे प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे. राज्याच्या वस्त्रोद्योग धोरण २०२३–२८ अन्वये रेशीम शेती व त्या आधारीत पूरक उद्योगांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्याच अनुषंगाने हे अभियान राबविले जात आहे. अभियानादरम्यान रेशीम शेतीचे महत्त्व, तुती लागवड, टसर रेशीम उत्पादन, तसेच रेशीम उद्योगातून मिळणाऱ्या आर्थिक लाभांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.

# कालवा सल्लागार समिती व पाणी आरक्षणाची बैठक

## ♦ जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी



**अमरावती:** १२/०२/२०२६ रोजी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समिती व पाणी आरक्षणाची बैठक नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे संपन्न झाली.

बैठकीमध्ये सन २०२५ २६ मध्ये उर्ध्व वर्धा प्रकल्पामधून सोडण्यात येणाऱ्या पाणी आवर्तनाची संपूर्ण माहिती देण्यात आली. तसे उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे लाभक्षेत्र हे अमरावती व वर्धा जिल्ह्यात असून प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या दोन्ही कालव्यामधून रब्बी हंगामासाठी पाणी सोडण्यातचे नियोजन करण्यात आले आहे अद्यापपर्यंत या दोन्ही कालव्याद्वारे ३ पाणी पाळ्यांची आवर्तने पुर्ण झाली असुन उर्वरीत २ आवर्तन मार्च २०२६ पर्यंत देण्याचे नियोजन आहे. रब्बी हंगाम २०२५-२६ करीता ३१००० हे. सिंचन क्षेत्राचे नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी ३ पाणी पाणी आवर्तनाद्वारे १०००० हे. क्षेत्रावर सिंचन झाले आहे, अशी माहिती मा.श्री. मनिष राजभोज, अधिक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती यांनी दिली. जलसंपदा व कृषी विभाग यांनी समन्वय साधुन उन्हाळी पिक क्षेत्रामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याचे आवाहन मा. जिल्हाधिकारी यांनी केले.

तसेच सन २०२५-२६ करिता या प्रकल्पामधुन पिण्यासाठी ६१.९११ दलघमी व औद्योगिक २५.००० दलघमी औष्णीक वीज केंद्राचा संभाव्य पाणीपुरवठा २५.००० दलघमी संभाव्य औद्योगिक पाणीपुरवठा २.५० दलघमी एकुण बिगर सिंचन संभाव्य पाणीसाठा ८९.४११ दलघमी असे एकुण बिगर सिंचन पाणी आरक्षणास मा. जिल्हाधिकारी यांच्याकडुन मंजुरी प्रदान करण्यात आली. तसेच बिगर सिंचन ग्राहक पाणी पुरवठा योजनेची थकबाकी मोठ्या प्रमाणात असल्याचे निदर्शनास आल्यामुळे संबंधित यंत्रणेला मार्च २०२६ पुर्वी थकबाकी भरण्याच्या सुचना मा. जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

या बैठकीकरीता हरदृष्य प्रणालीद्वारे (व्हृा) . दादारावजी केचे, विधानपरिषद सदस्य यांनी सर्व लाभधारकांना विहीत वेळेत पाणी पोहचण्याबाबत नियोजन करण्याबाबत निर्देश दिले.

# वाहतुकीचे नियम पाळा: वाहतूक अपघातांना द्यायचा असेल आळा तर रस्ते सुरक्षिततेचे नियम पाळा

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी




**अमरावती :** सू रक्षा रॅलीतून जनजागृती नरुला इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड (NIPL) आणि जे आय एस ग्रुप (kIS Group) यांच्या माध्यमातून सुरक्षा सप्ताह (सुरक्षा संकल्प) निमित्त अमरावती शहरात रोड सुरक्षा व जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीचा उद्देश नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि रस्ते अपघात टाळण्यासाठी सुरक्षित वाहनचालना करण्याचा संदेश देणे हा होता. रॅलीदरम्यान नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर, वेगमर्यादा पाळणे तसेच सुरक्षित ड्रायव्हिंगच्या सवयी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला NIPL Ltd. चे INTRACITY Ler&d अमेय सावंत, LM Ler&d आकाश देशमुख, ROW Lerd नागूरशरीफ शेख तसेच NIPL Ltd. ची संपूर्ण टीम उपस्थित होती. या जनजागृती रॅलीमधून सर्वसामान्य नागरिकांना रोड सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सुरक्षिततेची जाणीव अधिक बळकट होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.ष्सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरता पवन देशमुख, नरेश टागोर, विजयकुमार भारती, नईम सय्यद, राहुल खवासे, राजू कुमार, अजिंक्य सोनूणे, पंकज बागडे,राहुल मिसार, विवेक हुमणे, रोशन गोसावी, मनोज निखारे, विशाल अक्केवार, यश खोडणकर, शुभम पंचेश्वर, आदित्य देशमुख या सर्व इंजिनिअर लोकांनी अथक मेहनत घेतली आणि सहभाग नोंदवला.

## ♦ मध्यप्रदेशातील खजुराहो मध्ये बागेश्वर धाम येथील पंडीत धिरेंद्रजी शास्त्री महाराज द्वारा आयोजित

# सामुहिक कन्या विवाह महोत्सवात आ. रवि राणा व मा. खा. नवनीत राणा यांची विशेष उपस्थिती

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अमरावती :** मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ.मोहनजी यादव, पुज्य जगत गुरु रामानंदाचार्य डॉ.रामकमलाचार्य वेदांतीजी महाराज, पुज्य भाई रमेश भाई ओझा, पुज्य पंडीत प्रदिपजी मिश्रा, श्रद्धेय श्री.संजीव कृष्ण ठाकुर जी महाराज यांच्या आशीर्वादाने संपन्न होणाऱ्या सामुहिक कन्या विवाह महोत्सवाचे आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा यांना विशेष निमंत्रण

२ फेब्रुवारी २०११ रोजी ३७२० जोडप्यांसोबत स्वत: चा विवाह करुन शेतकरी, शेतमजुर, कामगार व सर्वसामान्य, गोर गरिब कुंटुबातील मुला मुलींच्या आई वडिलांचा खर्च वाचवुन समाजापुढे आदर्श ठेवणारे .आमदार रवि राणा व भाजपा नेत्या मा.खा.नवनित राणा यांचा सामुहिक कन्या विवाह महोत्सवामध्ये पंडित धिरेंद्रजी शास्त्री महाराज यांच्या हस्ते होणार विशेष सन्मान उपस्थित राहणार आहेत.

आ.रवि राणा व भाजपा नेत्या मा.खा.नवनित राणा यांच्या दि.१५ फेब्रुवारी रोजी खजुराहो मध्यप्रदेश येथे विशेष दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मध्यप्रदेशातील खजुराहो जि.छत्तरपुर येथे प्रसिद्ध बागेश्वर धाम येथे पंडित धिरेंद्रजी शास्त्री महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित भव्य सामूहिक कन्या विवाह महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सामाजिक व धार्मिकदृष्ट्या महत्त्वाच्या कार्यक्रमात महाराष्ट्रातील आमदार रवि राणा व भाजप नेत्या, माजी खासदार नवनित राणा यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या सामूहिक कन्या विवाह महोत्सवासाठी आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा यांना विशेष निमंत्रण देण्यात आले असून, दिनांक १५ फेब्रुवारी रोजी ते खजुराहो येथे दाखल होणार आहेत. या दौऱ्याअंतर्गत ते बागेश्वर धाममध्ये आयोजित विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे, २ फेब्रुवारी २०११ रोजी आ.रवि राणा व भाजपा नेत्या मा.खा.नवनित राणा यांनी ३७२० जोडप्यांसोबत स्वतःचा विवाह करून एक ऐतिहासिक व आदर्शवत उदाहरण समाजासमोर ठेवले होते. शेतकरी, शेतमजूर, कामगार तसेच सर्वसामान्य व गोरगरीब कुटुंबातील मुला-मुलींच्या विवाहाचा मोठा खर्च वाचवून त्यांनी सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला होता. याच उल्लेखनीय कार्याची दखल घेत, सदर सामूहिक कन्या विवाह महोत्सवात पंडित धिरेंद्रजी शास्त्री महाराज यांच्या हस्ते आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. हा महोत्सव केवळ विवाहसोहळाच नसून, समाजातील गरजू घटकांना आधार देणारा, सामाजिक एकोपा आणि संस्कारांचे महत्त्व अधोरेखित करणारा उपक्रम असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा यांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, त्यांच्या सामाजिक कार्याची पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जात आहे. एकूणच, खजुराहो येथील बागेश्वर धाममध्ये होणारा हा सामूहिक कन्या विवाह महोत्सव सामाजिक समरसतेचा व सेवाभावाचा संदेश देणारा ठरणार असून, आ.रवि राणा व भाजपा नेत्या मा.खा.नवनित राणा यांचा विशेष दौरा व सन्मान हा कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

# लासूरचे ऐतिहासिक आनंदेश्वर मंदिर

## ♦ मंदिरात महाशिवरात्रीची लगबग, विविध कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी



महाशिवरात्री विशेष

**दर्यापूर:** अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यात येणारे लासूर येथील स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना असणारे हेमाडपंथी शैलीचे आनंदेश्वर अर्थात महादेव मंदिर जो कोणी पाहिल तो थक्क होईल. अष्टकोनी आकाराच्या या मंदिरावर छत नाही. याठिकाणी महाशिवरात्रीनिमित्त सप्ताह सुरू असून कीर्तन व प्रवचनाचे कार्यक्रम सुरू आहेत.

महाशिवरात्रीनिमित्त या मंदिर परिसरात अमरावती आणि अकोला, या दोन जिल्ह्यातील भाविकांची गर्दी पाहायला मिळते. अमरावती जिल्ह्यात

लासूर येथील छत नसलेले पुरातन शिवालय पूर्णा नदीच्या काठावर लासूर या गावात महादेवाचे मंदिर आहे. अष्टकोणी आकाराचे हे मंदिर जणू भल्या मोठ्या रथाला हत्ती जुंपला असावा, अशाच स्वरूपाचे दिसते. मंदिराचे संपूर्ण बांधकाम दगडीपाड़वा एकावर एक रचून करण्यात आले असून प्रत्येक दगडावर कोरीव काम करण्यात आले आहे. आनंदेश्वर महादेव मंदिरात एकूण १८ खांब आहेत. यापैकी बारा खांब खुले असून सहा खांब हे भिंतींमध्ये आहेत. प्रत्येक खांबावर अतिशय बारीक आणि शिलाईदार कोरीव काम आहे.

या मंदिरात एका गाभाऱ्यात शिवलिंग आहे, तर पूर्व आणि पश्चिमेकडे बांधण्यात आलेल्या गाभाऱ्यांमध्ये कोणत्याही मूर्ती नाहीत.

याठिकाणी अनेक कोरीव दगड पडलेले असून या गाभाऱ्यांमध्ये स्थापन केल्या जाणाऱ्या मूर्तींचे काम अर्धवट राहिले असावे, असा अंदाज व्यक्त केला जातो.

मंदिराच्या बाहेर भिंतीवर अनेक कोनाडे असून त्यामध्ये विष्णू, शिवब्रम्हा, राधाकृष्ण, गोवर्धन यांच्या कोरीव मूर्ती आहेत. यासोबतच हती, घोडे, लढवय्ये, डोंबारी, नर्तक, भक्तगण, माकड, हनुमान, गणपती आदी अनेक मूर्ती कोरण्यात आल्या आहेत.

लासूर येथील आनंदेश्वर मंदिर हे इसवी सन १२ व्या शतकात यादव राज्याच्या काळात देवगिरीच्या राज्याचे प्रधान हेमांद्री पंथ यांनी साडेसातशे वर्षांपूर्वी बांधले असावे, असा इतिहासकारांचा अंदाज आहे.

**लासूरसाठी बसफेऱ्या सुरू**

दर्यापूरपासून लासूर हे गाव पाच किमी असून अमरावतीवरून ५५ किमी आहे, तर अकोल्यावरून ५० किमी आहे. लासूर येथे जाण्यासाठी दर्यापूर ते अकोला बसफेऱ्या सुरू आहेत.

याच काळात अल्लाउद्दीन खिलजीने अचलपूर मार्गाने देवगिरी अर्थात दौलताबादवर आक्रमण केले होते. या प्रवासाचा मार्ग अचलपूरवरून दर्यापूर, असा होता. याच काळात या भागात मंदिर उभारले जात असताना अल्लाउद्दीन खिलजीच्या सैन्याची संख्या आणि त्यांची आक्रमकता पाहता या मंदिराच्या बांधकामासाठी असणारे शिल्पकार, मूर्तिकार, विशारद, मजूर हे सर्वजण पळून गेले असावे. यामुळे भारताच्या इतिहासात स्थापत्यकलेत वैशिष्ट्यपूर्ण असणारे लासूरचे हे मंदिर अर्धवटच राहिले आहे.

आता गत काही वर्षांपासून याठिकाणी श्रावण महिन्यात आणि महाशिवरात्रीला भाविकांची गर्दी वाढायला लागली आहे. महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी लासूर येशील आनंदेश्वर मंदिरात महाप्रसाद वितरित केला जातो. लासूरच्या महादेवाला पातोडीच्या भाजीचा नैवेद्य अर्पण केला जातो आणि हाच महाप्रसाद वितरित होतो.

# इंटर रिजन क्रिकेट टूर्नामेंट अमरावती २०२६

## ♦ स्टेट बँक ऑफ इंडिया ऑफिसर्स असोसिएशन च्या वतीने क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी



**अमरावती:** बँकिंग कार्यालयीन कामकाज हाताळतांना बँक ग्राहकांचे हीत जोपासित त्यांना विश्वसनीय - पारदर्शक - गतिमान सेवा देण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाची सेवा तत्पर व अग्रगन्य म्हणून संपूर्ण देशभरात सर्वांनाच परिचित आहे. अशातच शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी अमरावती येथील पी. डी. एम. सी. च्या समीप असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगण येथे एस. बी. आय. ऑफिसर्स असोसिएशन महाराष्ट्र सर्कल अमरावती झोन च्या वतीने एकदिवसीय क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले. या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात अमरावती विभागातून अमरावती - अकोला -यवतमाळ - बुलढाणा - वाशीम या जिल्हातील एस. बी. आय. च्या अधिकाऱ्यांच्या चमुने सहभाग नोंदवला होता. या क्रिकेट स्पर्धेच्या वेळी एस. बी. आय. ऑफिसर्स असोसिएशन चे जनरल सेक्रेटरी - डॉ. सतीश टाके उदघाटक म्हणून उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून ऑर्गनायझिंग सेक्रेटरी -निलेश सराड, सहायक महाप्रबंधक - शशिकांत फरकाडे, भूपेंद्र मुधोळकर आदी उपस्थित होते. सर्वप्रथम हिंदवी स्वराज्याचे संस्थापक - छत्रपती शिवाजी महाराज व भारतीय घटनेचे शिल्पकार - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अतिथीच्या वतीने माल्यार्पण करण्यात आले.तदनंतर आयोजकांचे वतीने अतिथी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. एस.बी. आय. चे दैनंदिन कामकाज, उलाढाल, बँक ग्राहकांचे समुपदेशन, त्यांच्याशी सुसंवाद साधित स्वच्छ - गतिमान - तत्पर सेवा देण्यासाठी आज एस. बी. आय. ऑफिसर्स यांनी आपले अविरतपणे योगदान देऊन संपूर्ण देशभरात एक आगळीवेगळी ओळख बँकिंग विश्वात निर्माण केली आहे. तणावमुक्त व तणावविरहित जीवनासाठी व्यायाम - क्रीडा - योगा ह्या बाबी मनुष्यासाठी निकडीच्या झाल्या आहेत. दैनंदिन कामकाज - व्यवहार - आयुष्यातील व्यस्तता बाजूला सारित एक विरंगुळा तसेच क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून एस. बी. आय. ऑफिसर्स यांनी खेळीमेळीच्या वातावरणात ’ हम भी हैं, जोश मे ’ च्या अंदाजात या एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत सहभाग नोंदवत दर्जेदार खेळाचे प्रदर्शन केले आहे.

ही बाब यशस्वी आयोजन तसेच आपल्या अष्टपैलू कामगिरीची जणू पावती आहे. या शब्दांत - क्रिकेट स्पर्धेचे उदघाटक - डॉ. सतीश टाके यांनी सर्व सहभागी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्यात. यावेळी पहिला सामना हा एसबीआय अमरावती विरुद्ध एसबीआय अकोला यांच्यात झाला. नाणेफेक जिंकल्यानंतर एसबीआय अमरावती ने आधी क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेत दमदार खेळाचे प्रदर्शन करीत उपस्थितांच्या टाळ्यांची दाद मिळवीली.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अमरावती :** राज्यातील अनुसूचित जमातीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी परदेशात उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध असून आदिवासी विकास विभागामार्फत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. या योजनेंतर्गत ४० पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी तत्काळ ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन सहप्रकल्प अधिकारी राहुल ठोंबरे यांनी केले आहे.

शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष पुढीलप्रमाणे : उमेदवार व उमेदवाराचे आई, वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवाराच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्यायावत (२०२६ मधील) क्यूएस वर्ल्ड रँकिंग २०० च्या आत असणे बंधनकारक आहे. विहीत निकषानुसार पात्र विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास क्यूएस वर्ल्ड रँकिंग २०० पासून पुढे चढत्या क्रमाने ३०० पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

या शिष्यवृत्तीमध्ये शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, निवास व भोजन खर्च, शैक्षणिक साहित्य व अनुषंगिक खर्च, विमान प्रवास खर्च, व्हीसा शुल्क, आरोग्य विमा तसेच इतर आवश्यक खर्चाचा समावेश करण्यात आला आहे.

## सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# रस्त्याच्या मधोमध विद्युत खांब; अपघाताची शक्यता !

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**आपत्कालीन सेवांनाही फटका !**

रस्त्याच्या मधोमध उभे असलेले विद्युत खांब हे केवळ वाहतुकीस अडथळा नसून, सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न बनला आहे. विद्यार्थ्यांची शाळेत ये-जा, रुग्णवाहिका व आपत्कालीन सेवांनाही याचा फटका बसत आहे. अपघात झाल्यानंतरच प्रशासन हालचाल करणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**खामगाव :** शहरासह ग्रामीण भागातील अनेक मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर आजही विद्युत खांब रस्त्याच्या मधोमध उभे असल्याचे धोकादायक चित्र आहे. वाहतुकीच्या मार्गात थेट अडथळा ठरणारे हे खांब अपघाताला आमंत्रण देत असून, महावितरण मात्र डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. खामगाव शहरातील काही प्रमुख रस्ते, तसेच ग्रामीण भागातील दळणवळणासाठी महत्त्वाच्या मार्गाचे डांबरीकरण व रुंदीकरण झाले असले, तरी रस्त्याच्या मधोमध असलेले विद्युत खांब हटविण्यात आलेले नाहीत. परिणामी, दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहन चालकांना तारेवरची कसरत करत वाहन चालवावे लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी प्रकाशाअभावी किंवा वेगात असलेल्या वाहनांना हे खांब दिसून न आल्याने धडक होण्याची शक्यता अधिक वाढली आहे.गेल्या काही महिन्यांत अशा ठिकाणी अपघात घडल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. सुदैवाने काही वेळा जीवितहानी टळली असली, तरी किरकोळ ते गंभीर जखमा झालेल्या घटना नोंदविल्या गेल्या आहेत. स्थानिक नागरिकांनी अनेकदा संबंधित यंत्रणांकडे तक्रारी करूनही ठोस कार्यवाही होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

# प्रस्तावित करवाढीविरोधात नागरिकांमध्ये असंतोषः ३३ टक्के नागरिकांच्या हरकती

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**खामगांवः** नगरपालिकेने सुचविलेल्या मालमत्ता करवाढी विरोधात शहरात असंतोष वाढत असून, मालमत्ता धारकांकडून हरकती दाखल करण्याचा ओघ कायम आहे. शुक्रवारी हरकत दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी ९ हजार ८५५ हरकती नोंदविल्याचे समोर येत आहे. शहरातील एकूण मालमत्ताधारकांच्या संख्येपैकी तब्बल ३३ टक्के मालमत्ता धारकांनी हरकती नोंदविल्या आहेत. ही करवाढ अवाजवी आणि नागरिकांच्या आर्थिक क्षमतेपलीकडील असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

नगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्तांवर लावण्यात आलेला नव्या दरानुसार कर अनेक पटींनी वाढल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सामान्य नागरिक, व्यापारी तसेच मध्यमवर्गीय कुटुंबांवर मोठा आर्थिक बोजा पडणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर शहर भरातून या प्रस्तावाला तीव्र विरोध दर्शविला जात असून नागरिक नगरपालिकेच्या निर्णयावर पुनर्विचार करण्याची मागणी करत आहेत. प्रस्तावित करवाढीविरोधात केवळ नागरिकच नव्हे तर विविध संघटनांनीही आक्रमक भूमिका घेतली आहे. वकील संघाने या करवाढीला कायदेशीर आव्हान देण्याचा इशारा दिला असून, आवश्यक असल्यास उच्च न्यायालयात दाद मागण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.. मालमत्ताधारकांना हरकती दाखल करण्यासाठी सुरुवातीला फेब्रुवारीपर्यंत मुदत दिली होती. मात्र, ही मुदत वाढवून आता १३ फेब्रुवारी करण्यात आली होती.

# सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## श्री गौतमेश्वर महादेव संस्थानतर्फे भागवत कथेचे आयोजन

**तेल्हारा:** श्री गौतमेश्वर महादेव संस्थानच्या वतीने महाशिवरात्री निमित्त भक्तीमय वातावरणात शिवपुराण भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. कथेचे प्रवचन ह.भ.प. रामदास महाराज जंजाळ (वाचस्पती) करतील. महादेव मंदिरासमोर गौतमा नदीच्या तिरावर १५ फेब्रुवारीला यात्रा भरणार आहे.

सात दिवसीय कार्यक्रम ९ फेब्रुवारी पासून सुरू झाला असून सोमवार १६ फेब्रुवारीला समाप्ती होणार आहे. भागवत कथेच्या माध्यमातून भक्तांना अध्यात्म, संस्कार व नैतिक मूल्यांचे मार्गदर्शन मिळत आहे. कार्यक्रमाची सांगता सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी

**महाशिवरात्रीला भव्य यात्रा**

महाप्रसादाने होणार असून दुपारी १२ ते ३ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या भागवत कथेचा लाभ घेण्यासाठी सर्व भाविक भक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री गौतमेश्वर महादेव संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

## शिवजयंती पर्वावर शिवाजीनगर येथे भव्य मोफत आरोग्य शिबिर

**अकोला:** जुने शहर शिवाजीनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज जन्म उत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती पर्वावर अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.बुधवार १८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता शिवाजीनगर परिसरातील आई तुळजाभवानी मंदिर परिसरात मोफत भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात तज्ञ वैद्यकीय तज्ज्ञांच्या वतीने नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.या शिबिरात अस्थीरोग व फ्रॅक्चर तज्ञ डॉ प्रणय महल्ले, हृदयरोग, मधुमेह, मेंदू विकार तज्ञ डॉ स्वप्नील लाहोळे, पचनसंस्था, यकृत विकार व इंडोस्कोपी तज्ञ डॉ शिवाजी ठाकरे आदी वैद्यकीय तज्ञ रुग्ण तपासणी करणार आहेत.या शिबिरात मोफत नेत्र तपासणी व ईसीजी काढण्यात येऊन सत्यसाई सेवा संघटनाच्या वतीने रुग्णांना मोफत औषधे वितरित करण्यात येणार आहेत.

## शिवर ते शेगाव पायदळ वारीचे आयोजन

**अकोला :** ग्रामदैवताच्या कृपेचा आणि भक्तीभावाचा अद्वितीय सोहळा ठरणारी शिवर ते शेगाव पायदळ वारी यावर्षीही भक्तांच्या उत्साहात पार पडणार आहे. श्री दुर्गादेवी संस्थान शिवर यांच्या विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही २१ ते २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पायदळ वारीचे आयोजन करण्यात आले आहे.

भक्तिभाव, एकात्मता आणि परंपरेचा सुंदर संगम असलेली ही वारी शिवरहून प्रारंभ होऊन शेगाव येथे पोहोचणार आहे. हरिनामाच्या गजरात, टाळ-मृदुंगाच्या नादात आणि ठजय माता दीठच्या घोषणांनी परिसर दुमदुमणार असून, शेकडो भाविक या पवित्र पायदळ वारीमध्ये सहभागी होणार असल्याचे अपेक्षित आहे. या वारीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी श्री दुर्गादेवी संस्थान शिवर येथे रितसर नोंदणी करावी, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष जगदीश मुरुमकार तसेच विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. वारीदरम्यान भाविकांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा व इतर आवश्यक व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहितीही देण्यात आली.

# गोपालखेड, पिलकवाडी ग्रामस्थांचे ग्रामदैवत श्रीमारुती व ब्रह्मचारी महाराज तीर्थक्षेत्र पानेट संस्थान



### महाशिवरात्रीनिमित्त पंचक्रोशीतील शेकडो भाविक दाखल

पवन बेलसरे १५ फेब्रुवारी

**अकोट:** अकोट तालुक्यामधील स्वयंभू शिवलिंगाचे प्राचीन काळातील साक्षात्कार असलेले पंचक्रोशीतील भाविकांचे गोपाळ गोपालखेळ पिलकवाडी नखेगाव या ग्रामस्थांचे ग्रामदैवत श्री मारुती व श्री संत ब्रह्मचारी महाराज तीर्थक्षेत्र पानेट संस्थान या पावन पवित्र ठिकाणावर महाशिवरात्रीच्या निमित्ताने सर्व गाववासी व बाहेरगावावरून येणाऱ्या माहेरवाशींनी मोठ्या भावनिकतेने दाखवल होतात, तीर्थक्षेत्र पानेट-पिलकवाडी व नखेगाव येथील ग्रामस्थांनी व आयोजक समितीने पूर्ण नदीच्या पात्रामधून भाविकांना दर्शन घेण्यासाठी चोख रस्त्याची व्यवस्था करून दिली आहे व गेल्या आठ दिवसापासून येथे अखंड हरिनाम सप्ताह च्या निमित्ताने भाविकांची मंदी आली रात्रंदिवस येथे पाहायला मिळत आहे, येथे १०० फूट खोल जमिनीतील स्वयंभू महादेवाच्या पिंडीचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांची मोठी गर्दी उसळणार पूर्णा नदीच्या पायथ्याशी असलेल्या श्री ब्रह्मचारी महाराज संस्थान पानेट-पिलकवाडी येथे वर्षातून एकदाच भाविकांसाठी हे मंदिर

महाशिवरात्रीपूर्वी पिलकवाडी, नखेगाव, गोपालखेड व परिसरातील ग्रामस्थ एकत्र येऊन जवळपास १५ दिवस माती उत्खनन करून खोल पिंडीपर्यंत मार्ग तयार करतात. तसेच मंदिर परिसरातील गाळ काढून भाविकांना सुरक्षित दर्शनाची व्यवस्था केली जाते. ग्रामस्थांच्या श्रमदानातून पारंपरिक पद्धतीने हे शिवकार्य दरवर्षी पार पाडले जाते.

१०० फूट खोल, मंदिरात महादेवाच्या १२ पिंडी विविध कपारींमध्ये असल्याची स्थानिकांची श्रद्धा आहे.. या ठिकाणी ब्रह्मचारी महाराजांना महादेवाचा साक्षात्कार झाल्याची आख्यायिका सांगितली जाते.. परिसरात सप्ताहाचे आयोजन करण्यात येते व महाशिवरात्रीनंतर दुसऱ्या दिवशी काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होते व महाप्रसादाचे भव्य आयोजन केल्या जाते, ऐतिहासिक परंपरेनुसार संत गजानन महाराज, नरसिंह महाराज व ब्रह्मचारी महाराज हे समकालीन असून येथे येत असत, अशीही श्रद्धा व्यक्त केली जाते. तसेच काहींच्या मते छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळाशीही या स्थळाचा संदर्भ जोडला जातो. अकोल्यावरून गांधीग्राम-गोपालखेड मार्गे पूर्णा नदी पुलाजवळून सुमारे ३ किमी अंतरावर हे स्वयंभू मंदिर आहे. काही भाविक गोपालखेडकडील कच्च्या रस्त्याने तर अकोट तालुक्यातील भाविक करोडी फाटामार्गे नखेगाव होत येथे येतात. पूर्णा नदीच्या पात्रातूनही अनेक भाविक पायी दर्शनासाठी पोहोचतात. महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर उद्या सकाळपासून शेकडो भाविक दाखल होण्याची अख्या महाराष्ट्रातून या पूर्णा नदीच्या साक्षात्कार भाविकांना देणारा साक्षात्कार स्वयंभू शिवलिंगाच्या दर्शनासाठी आज येथे हजारोंच्या संख्येत भाविक दाखल होतात.



## चित्रपटाचे 'घुसखोर पंडत' नाव देणाऱ्या चित्रपट निर्मात्यावर कारवाई ची मागणी

### ♦ अ. भा. ब्राह्मण महासंघ तथा परशुराम जन्मोत्सव समितीची मागणी

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**तेल्हारा:** चित्रपट निर्माता निर्देशक निरज पांडे यांचे विरुद्ध चित्रपटाचे नाव 'घुसखोर पंडत' ठेवून ब्राह्मण समाजाच्या भावना दुखावल्याबद्दल कायदेशीर कारवाई करण्याची मागणी शहर व तालुका अ.भा. ब्राह्मण महासंघ तथा परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने एका तक्रार अर्ज द्वारे, करण्यात आली.

तेल्हारा तहसीलदार यांना १२ फेब्रुवारी रोजी तक्रार देण्यात आली असून सिनेसृष्टीतील एक निर्माते निर्देशक निरज पांडे यांनी आपल्या सिनेमाचे घुसखोर पंडित नाव दिले आहे. त्यामुळे ब्राह्मण समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत.

संबंधितांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करावी. अशी मागणी करण्यात आली आहे. सदरहू तक्रार अर्जावर राजेश पालीवाल, दीपक जोशी, दीपक वैष्णव, जितेंद्र छांगाणी , ताराचंद पालीवाल, अनिल जोशी, शरद शुक्ल, जितेंद्र पालीवाल, अल्केश पालीवाल, ॲड. पवन शर्मा यांच्या सह्या आहेत. उपरोक्त आशयाचे एक निवेदन १० फेब्रुवारी रोजी ठाणेदार पोलीस स्टेशन तेल्हारा यांना सादर करण्यात आले. सदर्ह निवेदनावर नवल जोशी, जितेंद्र छांगाणी एम. एम, पदावाड, गजानन मुंजे, महेंद्र देशपांडे, दीपक जोशी, दीपक वैष्णव, शरद शुक्ल, राजेश पालीवाल, ताराचंद पालीवाल, ॲड. सागर शर्मा, संतोष छांगाणी, रवींद्र शर्मा दीपक छांगाणी, निलेश तिडके भक्ती छांगाणी. पवन शर्मा, योगेश पांडे, गौरव छांगाणी, संतोष छांगाणी इत्यादींच्या सह्या आहेत.

## खेंडकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शाळेला वृक्ष भेट पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत निरोप समारंभ

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोला:** सरस्वती नगरातील विष्णुपंत खेंडकर माध्यमिक विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ १४ फेब्रुवारी रोजी झाला. मुख्याध्यापक निलेश खेंडकर, स्व. यमुनाबाई खेंडकर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अल्केश खेंडकर उपस्थित होते. सरस्वती पूजनानंतर वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला वृक्ष भेट देऊन पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला.



मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासात लक्ष ठेऊन यशस्वी व्हावे असे मार्गदर्शन केले. अध्यक्षांनी १४ फेब्रुवारी रोजी पुलवामा मधील शहिदांना आदरांजली वाहिली. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या. तसेच श्रीकांत पागृत, प्रज्ञानंद थोरात व कांचन वानखडे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांनी गुलाब पुष्प देऊन अतिथींचे स्वागत केले. काही विद्यार्थ्यांनी शाळेला भेट वस्तू प्रदान केली. दहावीच्या विद्यार्थ्यांतून श्रेया वानखडे, मानसी वानखडे, पायल महाजन, गौरी हडकर, अक्षरात धनोकार, रितेश सोनवणे, कुणाल गेडाम, कर्तव्य टोम्पे, विश्वेश इंगळे यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले.

शिक्षकांनी हळव्या मनाने विद्यार्थ्यांना निरोप देत विद्यार्थ्यांनी संपूर्ण लक्ष अभ्यासात केंद्रित करून शाळेला १००ज्ञ् निकाल द्यावा. आपले पालक व शाळेचा नावलौकिक वाढवावा अशी अपेक्षा व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेतील शिक्षक गोपाल वानखडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन केले. तर आभार प्रदर्शन उषा जगदाळे यांनी केले.

## समाजहिताच्या उपक्रमशीलतेने माळी समाज सक्षम बनवा : अविनाश ठाकरे

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोट:** सामाजिक संघटन, समाजकारण, राजकारण, महिला सक्षमीकरण तसेच उद्योग व शेती क्षेत्रात लक्ष केंद्रित करून माळी समाजाने उद्यामशिल व रोजगाराभिमुख व्हावे, असे विचार माळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश ठाकरे यांनी व्यक्त केले.

माळी समाजातील सर्वच शाखा, पोटशाखा एकत्र येऊन विकास सहज शक्य आहे असे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अरुण तिखे म्हणाले. राज्याचे कोषाध्यक्ष नानासाहेब कांडलकर व मुकुंद पोटदुखे पश्चिम विदर्भ अध्यक्ष, रामदास खंडारे वधू वर परिचय मेळावा अध्यक्ष यांनी कार्यक्रमाचे व सहभागी झालेल्या सर्व समाज बांधवांचे कौतुक केले.





कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीसुर्य महात्मा जोतीबा फुले सावित्रीआई फुले व संत श्रेष्ठ सावता महाराज यांच्या प्रतिमांना हार अर्पण व दिप प्रज्वलन करून झाली . सुरुवातीला सर्व समाज बांधवांचा परिचय व व्यवसाय परिचय घेण्यात आला याप्रसंगी समाजातील सर्वांनी एकमेकांना कशी कशी साथ द्यावी , कशा प्रकारे समाजजीवन समृद्ध करता येईल याचे अतिशय मार्मिक उद्बोधन पुराव्यासह सप्रमाण सिद्ध विभागीय कार्यध्यक्ष प्रशांत लांडे यांनी केले व समाजीतील येणारी आव्हाने कशी पेलता येईल याची जाणिव त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली. अकोट स्थित माळी महासंघाचे विभागीय कार्याध्यक्ष याचेही यथोचित भाषण झाले याप्रसंगी समाजातील गणमान्य व्यक्तींसोबत च महासंघाचे पदाधिकारी वासुदेव लोखंडे, डिगांबर लोखंडे, ॲड प्रविण करुले, मंगेश सातव, सतीश चोपडे, विक्रांत इंगळे, केशव मेहरे, रवी खेतकर, संजय पिंपळे, मोहन चिंचोलकर, जगतजीवन पल्हाडे, रंजनाताई मेहरे, निलाक्षि गांजरे, उषाताई भोपळे, रविंद्र सोनार, रूपम घाटोळ दादाराव पवार, नंदकुमार बहादुरे, शिवराम बावस्कर, प्रशांत कलोरे, मोहन बेलसरे, अतुल पोजगे, तुषार हांडे, देवीदास बेलसरे, दिपक मेहर व मोठया प्रमाणात समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाला नागपूर, अमरावती, दर्यापूर व अकोट तालुका संघटना पदाधिकारी उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन दिलीप अंबाळकर, व संतोष बायस्कर यांनी केले व वासुदेव लोखंडे यांनी आभार प्रदर्शन केले, कार्यक्रमाला स्नेहभोजनाची व्यवस्था केलेली होती सर्व माळी महासंघ महिला पुरुष व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शालार्थ चौकशीच्या नावाखाली शिक्षकांची थकीत देयके थांबवु नये

### ♦ मनीष गावंडे यांची शासन व प्रशासनाकडे मागणी

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोला :** महाराष्ट्र शासनाने शालार्थ घोटाळा उघडकीस आल्यानंतर राज्यातील २०१२ नंतर नियुक्त शिक्षकांचे शालार्थ तपासण्याकरिता एस.आय.टी. समिती गठीत केली आहे. सदर समितीची चौकशी सुरू असून समितीचा अंतिम अहवाल अद्याप आलेला नसतांनाही केवळ शालार्थ चौकशी यादीत नाव असलेल्या शिक्षकांची मंजुरी करीता सादर केलेली थकीत देयके शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून रद्द करण्यात येत आहेत. यामुळे शिक्षकांकडून प्राप्त तक्रारीनंतर भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनीष गावंडे यांनी ई-मेल द्वारा राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री मा.श्री.पंकजजी भोयर साहेब यांच्या सह राज्याचे शिक्षण आयुक्त, प्राथमिक व माध्यमिक विभागाचे शिक्षण संचालक यांना निवेदन सादर करून चौकशी यादीतील शिक्षकांचा चौकशीचा अंतिम अहवाल आलेला नसताना केवळ संशयाच्या आधारे थकीत देयके थांबवणे न्यायोचित नसुन शालार्थ चौकशीच्या नावाखाली थांबवलेली शिक्षकांचे थकीत देयक मंजूर करण्याबाबतचे निर्देश शिक्षणाधिकारी यांना देण्याबाबत विनंती केली आहे.

## श्री सोमेश्वर संस्थान येथे महाशिवरात्री पर्वाचे आयोजन

### ♦ काशीत वसे विश्वेश्वर..तळेगावात वसे सोमेश्वर

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**हिवरखेड:** ग्राम तळेगाव येथे पश्चिम वाहिनी, शिवलिंग असलेले प्रसिद्ध श्री.सोमेश्वराचे मंदिर आहे. या मंदिरात महाशिवरात्री निमित्त पंचक्रोशीतील भाविक भक्तांची उपस्थिती असते. तळेगाव बाजार येथील महाशिवरात्री उत्सव पुरातन काळापासून तीन दिवसाचा असतो.

पहिला दिवस महाशिवरात्री निमित शिवपुजन, दुसऱ्या दिवशी श्री. सोमेश्वराला कबुल केलेले नवस म्हणजे लहान मुलांचे लोटांगन आणि दुपारी रथ यात्रा प्रारंभ त्यानंतर तिसऱ्या दिवशी महाप्रसादाने सांगता असे उत्सवाचे स्वरूप असते. या वर्षी दि. १५/०२/२०२५ महाशिवरात्री निमित्त श्री.सोमेश्वर मंदिरात महापूजा



होऊन दर्शनासाठी पंचक्रोशीतील उपस्थित भाविक भक्तांना गावाकऱ्यांच्या वतीने फराळाचे वाटप करण्यात येईल. १६ फेब्रुवारी ला ग्रंथराज ज्ञानेश्वरी ग्रंथाची पूजा व दुपारी संस्थान परिसरातून श्री सोमेश्वरांच्या रथ मिरवणुकीला प्रारंभ होऊन अर्ध्या गावातुन प्रदक्षिणा करून पूर्वीपासून निश्चित केलेल्या जागी रथ मिरवणुक विसावा घेते.

१७ फेब्रुवारी ला काल्याचे किर्तन आणि भव्य यात्रेचे आयोजन करून दुपारी उर्वरित रथ मिरवणुकीस प्रारंभ होऊन याच दिवशी संध्याकाळी संस्थानच्या आवारात दहीहंडी आणि भव्य महाप्रसादाने महाशिवरात्री उत्सवाची सांगता होईल.

## विलास ठोसर यांच्या कवितेचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश

वि. प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोट:** अकोट येथील जेष्ठ कवी, कथाकार विलास ठोसर यांच्या तोरण ह्या कवितेचा श्री संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती बि.ए. भाग २ च्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. ही आनंददायी व अभिमानास्पद बाब आहे. यातच साहित्य क्षेत्रातील मित्र परिवारा कडून त्यांचे अभिनंदन होत आहे.



कवी विलास ठोसर हे आपल्या कवितेतून सुमधुर आवाजाने विद्यार्थ्यांमध्ये काव्याची, संस्कृतीची आणि सृजनशीलतेची बीजं पेलणारे मार्गदर्शक आहेत. त्यांच्या लेखणीची दखल श्री संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती अभ्यासक्रम मंडळाने नुकतीच घेतली व अभ्यासक्रमात त्यांच्या कवितेचा समावेश करण्यात आल्यामुळे संपूर्ण मित्र परिवार व साहित्य क्षेत्रात आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

## शिवप्रतिमा पूजनाने शिवजयंती सप्ताह प्रारंभ

**अकोला:** सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने दिनांक १९ फेब्रुवारी पर्यंत आयोजित शिव सप्ताहाचा स्थानीय शिवाजी महाराज पार्क परिसरात मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला.शनिवारी सकाळी ध्वज पूजनाने या उत्सवाचा प्रारंभ झाला.यावेळी समितीचे कार्यकारी व नगरसेवक पवन महल्ले,प्रदीप लुगडे,माजी अध्यक्ष निरंजन पावसाळे,राम बोंद्रे मनीष पटेल,राहुल लोहिया संदीप बाथो,सागर तिवारी गगन,ओबेरॉय,ऋषी जगताप,अविनाश कानगुडे, ललित भंगाळे, सुनील पवार,संतोष हीरपुरकर, उमेश शिरसागर व विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी हा गुरुकृपेचा सुंदर आविष्कार : नरहरी महाराज सांगळे

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोट:** ग्रंथराज ज्ञानेश्वरी हा केवळ ग्रंथ नसून तो आत्मस्वरूपाचे प्रगटन करणारा श्रेष्ठ ठेवा आहे. ज्ञानराज माऊलींनी ब्रह्मज्ञानाचे अत्यंत सुबोध शब्दांत प्रतिपादन केले असून, या ग्रंथाचे वाचन, मनन आणि चिंतन केल्यास प्रत्यक्ष स्वर्गसुखाची अनुभूती मिळते, असे प्रतिपादन ज्ञानेश्वरीचे कंठस्थ प्रवक्ते ह.भ.प. नरहरी महाराज सांगळे यांनी केले.

श्री संत वासुदेव महाराज यांच्या १०९ व्या जयंती महोत्सवानिमित्त आयोजित 'श्री ज्ञानेश्वरी भावकथा' महोत्सवातील प्रथम पुष्प गुंफताना ते बोलत होते.

### ♦ गुरुमाऊली जयंती महोत्सव




**ज्ञानक्षेत्रातील मोठी क्रांती**

आपल्या निरूपणात महाराज पुढे म्हणाले की, ठमाऊलींच्या पूर्वी अनेक महात्म्यांनी ब्रह्मज्ञान संस्कृत भाषेत मांडले होते. मात्र, माऊलींनी ते सर्वसामान्यांना समजेल अशा रसाळ मराठी भाषेत प्रकट करून मोठी क्रांती घडवून आणली. संस्कृतमध्ये बंदिस्त असलेले गुह्य ज्ञान सर्वसामान्यांसाठी खुले करण्यात माऊलींचा मराठी भाषेचा स्वाभिमान आणि उदात्त हेतू दिसून येतो. शास्त्र, पुराण आणि उपनिषदांपेक्षाही हा ग्रंथराज श्रेष्ठ आहे.

**विज्ञान आणि अध्यात्माचा समन्वय**

विज्ञानावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, ज्ञानेश्वरीत विज्ञान आणि अध्यात्माचा सुंदर समन्वय आढळतो. माऊलींच्या मते, विज्ञान समजल्याशिवाय अध्यात्म पूर्णपणे उमजत नाही. हीच त्यांच्या वाङ्मयीन प्रतिभेची मोठी शक्ती आहे.

**नित्य वाचनाचा हितोपदेश**

भाविक आणि साधकांनी दररोज किमान ११ ओव्यांचे नित्यनेमाने वाचन व चिंतन करावे. यामुळे दृश्य-अदृश्य सुखाची प्राप्ती होऊन आत्मस्वरूपाची ओळख पटते, असा मोलाचा संदेश महाराजांनी यावेळी दिला.

**भक्तांची मोठी उपस्थिती**

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. वासुदेवराव महल्ले यांनी नरहरी महाराजांचे यथोचित स्वागत केले. कथेच्या पहिल्याच दिवशी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


## नेर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**यवतमाळ :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अंतर्गत मॉडेल करिअर सेंटर व सिक्युरिटी अँड इंटेलिजन्स सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ फेब्रुवारी रोजी क्रीडा संकुल, नेर येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या मेळाव्यात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार भरती अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कंपनी सुरक्षा क्षेत्रात कार्यरत असून देशभरात २२ क्षेत्रीय मुख्यालये तसेच ३० शाखा कार्यालये विविध राज्यांमध्ये स्थापन आहेत. कंपनीअंतर्गत निवड झालेले उमेदवार विविध शासकीय, निमशासकीय, खाजगी तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये कार्यरत आहेत. या भरती अभियानाअंतर्गत सुरक्षा जवान पदासाठी ३०० जागा असून किमान दहावी उत्तीर्ण उमेदवार पात्र असतील. उमेदवारांचे वय १९ ते ४० वर्षे दरम्यान असावे. उंची किमान १६८ सेंटीमीटर व वजन ५८ ते ९० किलो असणे आवश्यक आहे.

# बंजारा समाजाच्या कायम पाठीशी : मुख्यमंत्री

### श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सवाचे उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

### पोहरादेवीत उद्योग निर्मितीला चालना देणार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी





**यवतमाळ :** संत सेवालाल महाराज यांनी समाजाला स्वाभिमान, सदाचार आणि सेवाभावाचा मार्ग दाखविला. त्यांचे विचार आजच्या काळात अधिक प्रेरणादायी आहेत. पोहरादेवी हे केवळ श्रद्धेचे केंद्र नसून, सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहे. पोहरादेवी परिसराचा नियोजनबद्ध विकास करताना श्रद्धेचा सन्मान राखून सुविधा अधिक सक्षम करण्यात येईल. बंजारा समाजाच्या कायम पाठीशी असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पोहरादेवी (जि. वाशीम) येथे शनिवारी आयोजित श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमात दूरदृश्यप्रणालीव्दारे संदेश देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. पर्यटन विकास हा केवळ आर्थिक प्रगतीपुरता मर्यादित नसतो, तर तो स्थानिक संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचे संवर्धन करणारा असतो. पोहरादेवी येथे महायुती सरकारच्या काळात झालेला हा शाश्वत विकास आहे, असे मुख्यमंत्री पुढे बोलताना म्हणाले.

यावेळी महोत्सवाचे उद्घाटन करताना, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, संत सेवालाल महाराज यांचे विचार समाजात समता, बंधुता आणि सेवाभाव रुजवणारे आहेत. पोहरादेवी हे केवळ धार्मिक स्थळ नसून, पर्यटनाच्या दृष्टीनेही मोठी क्षमता असलेले केंद्र आहे. या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी शासन आवश्यक त्या पायाभूत सुविधा, रस्ते, निवास व पर्यटक सुविधांसाठी सातत्याने प्रयत्न करत असल्याचे सांगितले. संत सेवालाल महाराज यांचा वारसा जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.पोहरादेवी सारख्या तीर्थक्षेत्रांचा विकास झाला, तर स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. शासन विकास आणि सामाजिक समरसतेसाठी कटिबद्ध आहे. पोहरादेवीत उद्योग निर्मितीला चालना देणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमाला मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार संजय देशमुख,आमदार धर्मगुरू बाबुसिंग महाराज, आमदार किरण सरनाईक, आ.सई डाहाके, आ.राजेश राठोड, आ. किसन वानखडे, पुसदच्या नगराध्यक्षा मोहिनी नाईक, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, पर्यटन उपसंचालक विजय जाधव, माजी खासदार हरिभाऊ राठोड यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी प्रास्ताविक भाषणात पर्यटन महोत्सवाची रूपरेषा विषद केली. समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी कायम प्रयत्नशील आहे. संत सेवालाल महाराज यांच्या विचारांवर समाज चालत आहे. संत सेवालाल महाराज यांची जयंती शासन स्तरावर साजरी करण्यात येते, असे ते म्हणाले. विकासकामांची माहिती देताना शासनाचे भक्कम पाठबळ पोहरादेवी विकासासाठी मिळत आहे. बंजारा काशीची परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल होत आहे, असे ते म्हणाले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास शासनाने श्री संत सेवालाल महाराज यांचे नाव दिल्याबाबत शासनाचे आभार व्यक्त केले. यावेळी महंत जितेंद्र महाराज यांनी मनोगत व्यक्त करताना संत सेवालाल महाराज यांनी शांतीचा संदेश दिला, असे सांगून लोकप्रतिनिधींनी बंजारा समाजाचा सर्वांगीण विकास करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी, संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सवामुळे पोहरादेवीचा नावलौकिक वाढत आहे. अशा उपक्रमांतून युवा पिढीला संस्कृतीची ओळख होते, असे सांगितले. शासनाच्या विविध योजनांचा लाभ या भागातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील राहील. पर्यटन राज्यमंत्री म्हणून पोहरादेवी विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### सेवारत्न पुरस्कारांचे वितरण

■ महोत्सवाच्या निमित्ताने समाजसेवा, सांस्कृतिक कार्य आणि सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सात मान्यवरांना सेवारत्न पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी पुरस्कारप्राप्त व्यक्तींचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले. या भव्य आयोजनामुळे पोहरादेवी येथील श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव राज्यपातळीवर विशेष लक्षवेधी ठरला असून, भविष्यात या परिसराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.या महोत्सवामुळे श्रद्धा, संस्कृती आणि पर्यटन विकास यांचा प्रभावी संगम घडून येत असल्याचे चित्र दिसून आले. कार्यक्रमाला विविध मान्यवर महंत, विश्वस्त, ट्रस्टी, देशभरातून आलेले हजारो समाजबांधव नागरिक उपस्थित होते.



## महाशिवरात्रीनिमित्त भव्य शंकरपट यात्रा

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी



**आर्णी :** महाशिवरात्री निमित्त देऊरवाडी (बुटले) येथे भव्य शंकरपट यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी ते शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. परिसरातील भाविक आणि बैलगाडा शर्यतप्रेमींमध्ये यात्रेबाबत विशेष उत्साह दिसून येत आहे.

यात्रेनिमित्त आयोजित शंकरपट स्पर्धेसाठी सुमारे २ लाख ३५ हजार रुपयांची रोख बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. प्रथम बक्षीस ५१ हजार रुपये, द्वितीय २१ हजार रुपये, तृतीय ११ हजार रुपये तर इतर आकर्षक बक्षिसांचीही घोषणा करण्यात आली आहे. राज्यातील विविध भागांतील नामांकित शंकरपट स्पर्धक सहभागी होणार असल्याने स्पर्धा रंगतदार होणार आहे.

यात्रेचे उद्घाटन शुक्रवार सकाळी ९ वाजता मान्यवरांच्या हस्ते करण्यात येईल. यात्रेदरम्यान धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन, महाप्रसाद आणि विविध पारंपरिक उपक्रम आयोजित केलेले आहेत.

हा महोत्सव देऊरवाडी (बुटले) गावकऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आले असून, आयोजकांनी भाविक व शंकरपटप्रेमींना मोठ्या संख्येने उपस्थित राहून यात्रेचा आनंद घेण्याचे आवाहन केले आहे.

## पुसदमध्ये अप्पर तहसील कार्यालयांची निर्मिती; शहराचा प्रशासकीय चेहरामोहरा बदलणार

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**यवतमाळ :** वाढती लोकसंख्या, भौगोलिक विस्तार आणि नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन महसूल विभागाने यवतमाळ विभागात मोठ्या प्रशासकीय बदलांची तयारी सुरू केली आहे. महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने विभागात ३ नवीन अप्पर जिल्हाधिकारी पदे आणि १० नवीन अप्पर तहसील कार्यालये निर्माण करण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. या बदलांमुळे नायब तहसीलदार ते तहसीलदार स्तरावरील पदोन्नतीला गती मिळणार असून, स्थानिक स्तरावर मोठा रोजगार उपलब्ध होईल.

वाशिम जिल्ह्यातील तीन महसूल मंडळांना 'अप्पर तहसील' दर्जा मिळणार असून, यामध्ये अनसिंग (तालुका वाशिम), केनवड (तालुका रिसोड), कामरगाव (तालुका कारंजा लाड) यांचा समावेश आहे. या कार्यालयांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना दाखले, जमिनीचे वाद आणि इतर कामांसाठी तालुक्याच्या ठिकाणी जाण्याची गरज उरणार नाही. प्रशासकीय सुलभतेसाठी विभागात तीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालये प्रस्तावित आहेत: अचलपूर (जिल्हा अमरावती), पुसद (जिल्हा यवतमाळ), खामगाव (जिल्हा बुलढाणा). विभागातील विविध तालुक्यांचा भार कमी करण्यासाठी नवीन अप्पर तहसील कार्यालये अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यांमध्ये उभारली जातील. या नवीन पदनिर्मितीमुळे महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीस मार्ग मोकळा होणार आहे. तसेच, कार्यालयांच्या संचलनासाठी नियमित पदांसह मोठ्या प्रमाणात कंत्राटी भरती केली जाणार आहे, ज्यामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होईल. आदिवासी आणि दुर्गम भागातील नागरिकांना जलद आणि सुलभ शासकीय सेवा मिळावी, हा प्रस्तावाचा मुख्य उद्देश आहे.

## महिलांनी माता रमाईचा वारसा पुढे चालवावा – के. के. पाईकराव

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**आर्णी :** मा. त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांचा त्याग आणि समर्पित कार्य हेच जीवनाचे खरे सोने असल्याचे प्रतिपादन के. के. पाईकराव यांनी केले. त्यांनी सांगितले की, आजच्या सर्व रमाईच्या लेकींनी माता रमाईच्या विचारांचा वारसा समर्थपणे पुढे चालवावा.

के. के. पाईकराव पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना माता रमाईची खंबीर साथ आणि सहकार्य लाभल्यामुळे उपेक्षितांच्या जीवनोत्थानासाठी समाजिक कार्य हाती घेता आले. माता रमाई या खऱ्या अर्थाने बहुजनांची माता ठरली आणि त्यामुळे समस्त महिलांनी त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे गरजेचे आहे, असे आवाहन त्यांनी व्यासपीठावरून केले.

हा कार्यक्रम नालंदा बहुउद्देशीय बुद्ध विहार समिती आणि रमाई बहुउद्देशीय महिला मंडळ, आर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने ७ फेब्रुवारी २०२६ रोजी के. के. पाईकरांच्या घरी आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारत बन्सोड, तर प्रमुख पाहुणे म्हणून भोजराज लोखंडे उपस्थित होते. कार्यक्रमात रमाई बहुउद्देशीय महिला मंडळाच्या अध्यक्ष लताबाई बनसोड, सचिव रमाबाई नगराळे, कोषाध्यक्ष रमाबाई तामगाडगे यांनी माता रमाईच्या तैलचित्राला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये सखुबाई पाईकराव, त्रिशला पाईकराव, नमिता लोखंडे, रेणूबाई कांबळे, रमाबाई नगराळे, कांचनमाला नगराळे, बेबीबाई कांबळे, रेशमा कांबळे, रमाबाई तामगाडगे, सज्जना नगराळे, अलका वाकोडे, सुरेखा लढे, इंदुबाई कांबळे, संध्या मोनेश्वर, सुमनबाई मनवर, ज्ञानेश्वर मेश्राम, यादवराव जाधव, दिगंबर नाईक आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिती संतोष नगराळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गौतम उद्धवराव तामगाडगे यांनी केले.

## घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती वाटप



प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**उमरखेड :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'प्रत्येकाला हक्काचा निवारा' संकल्पनेअंतर्गत अनेक बेघर, निवाराहीन नागरिकांना हक्काचे घरकुल मिळाले आहेत. पंतप्रधान आवास योजना आणि इतर विविध योजनांअंतर्गत पात्र घरकुल लाभार्थ्यांना हक्काच्या घरासोबत मोफत रेती देण्याचा उपक्रम राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हाती घेतला आहे.

उमरखेड – महागाव विधानसभा मतदारसंघात घरकुल लाभार्थ्यांसाठी मोफत रेती वाटपाचे कार्य प्रत्यक्षात सुरू झाले. या कार्यक्रमाचा शुभारंभ हिरवी झेंडी दाखवून उमरखेड तालुक्यातील बिटरगाव घाटावरून करण्यात आला.

यावेळी उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, तहसीलदार राजु सुरडकर, बिटरगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार पांडुरंग शिंदे, मंडळ अधिकारी गजानन सुरोशे, सरपंच लताताई घोडगे, डॉ. तिवारी, विनोद मामीडवार, पो.पा. नामदेव देवकते, भास्कर देवकते, अनिल नरवाडे (ग्राम महसूल अधिकारी), ग्रामपंचायत अधिकारी, इतर नागरिक उपस्थित होते.

## श्री.म.द भारती विद्यालयाला स्काउट्स राज्यपुरस्कार

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**आर्णी :** महाराष्ट्र राज्य भारत स्काउट्स आणि गाईड्स संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या शैक्षणिक सत्र 2025-26 राज्यस्तरीय राज्य पुरस्कार चाचणी परीक्षेचा निकाल नुकत्याच लागला.

श्री महंत दत्तराम भारती विद्यालय (मुख्य शाखा) मधील स्काऊट अनिकेतसिंग अजयसिंग सोमवंशी आणि आदित्य राजेंद्र मांगे यांनी उल्लेखनीय यश संपादन करून राज्यस्तरीय राज्य पुरस्कारास पात्र होण्याचा मान मिळवला. हा पुरस्कार मानवतेची सेवा आणि विश्वबंधुत्वासाठी एक महत्त्वाचा मानबिंदू आहे. या स्काऊट्सला स्काऊट्स मास्टर ए.डी. मानगावकर यांचे मार्गदर्शन लाभले, तर स्काऊट मास्टर एम.एस. राठोड आणि व्हि.बी. रेगुलवार यांनी सहकार्य केले. ए.डी. मानगावकर यांच्या मार्गदर्शनात



आजपर्यंत विद्यालयाला एकूण 50 राज्य पुरस्कार आणि 10 राष्ट्रपती पुरस्कार मिळाले आहेत. शाळेची उज्वल यशाची परंपरा आजही कायम आहे. संस्थेचे सचिव सिद्धार्थजी भारती यांनी स्काऊट्सचा सन्मान केला. यावेळी दत्त प्रसादिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा डॉ. किरणताई भारती, कोषाध्यक्ष प्रियदर्शनजी भारती, उपाध्यक्ष इंजिनीयर समृद्धजी भारती, संचालिका अश्विनीताई भारती, विद्यालयाचे मुख्याध्यापक ए.डी. जगताप, उपमुख्याध्यापक नन्नावरे, पर्यवेक्षक वानखडे, नामदेववार यांनी अभिनंदन केले.

## जिन क्र. २ मधील १४ गाळ्यांवरुन वाद पेटला!

### 'मनमानी कारभारामुळे लाखोंचे नुकसान : आठ संचालकांचा पत्रकार परिषदेतून आरोप : चौकशी व काम थांबविण्याची मागणी

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी



**उमरखेड :** तालुक्यातील सहकार क्षेत्रात महत्त्वाची ओळख असलेल्या सहकार महर्षी स्व. भाऊसाहेब माने शेतकरी सहकारी जिनींग अॅन्ड प्रेसिंग सोसायटी लि. या संस्थेमध्ये जिन क्र. २ मधील १४ दुकान गाळ्यांच्या बांधकामावरून मोठा वाद निर्माण झाला असून संस्थेचे आठ संचालकांनी अध्यक्षांवर मनमानी कारभार केल्याचा आरोप करत तब्बल ३० ते ४० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा गंभीर आरोप पत्रकार परिषदेतून दि. १३ रोजी जिनींग अॅन्ड प्रेसिंग सोसायटीच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत हा आरोप करण्यात आला असून, या संदर्भात सहाय्यक निबंधकांकडे अधिकृत तक्रारही दाखल करण्यात आली आहे.

या पत्रकार परिषदेला संस्थेचे मानद सचिव चितांगराव कदम, सतीश नाईक, डॉ. संजय माने, डॉ. भगवानराव देवसरकर, डॉ. संजय कदम, अतुल पाटील, कपिल चव्हाण आदी संचालक उपस्थित होते.

मानद सचिव कदम यांनी सांगितले की, दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत जिन क्र. २ मधील १४ दुकान गाळ्यांच्या बांधकामाचा विषय चर्चेला आला होता. संस्थेने नेमलेल्या सल्लागार अभियंता प्रणव कदम यांनी हे काम ८७५ रुपये प्रति स्क्वेअर फुट अधिक जीएसटी या दरात पूर्ण होऊ शकते, अशी माहिती दिली होती. या कामासाठी एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यामध्ये सर्वात कमी दर वैभव कोसलगे यांनी १४२५ रुपये प्रति स्क्वेअर फुट असा दिला होता.

बैठकीत सर्व निविदाधारकांना कार्यालयात बोलावून निगोशिएशन करून दर कमी करण्याचे ठरले होते. मात्र, अध्यक्षांनी इतर संचालकांना विश्वासात न घेता स्वतःच टेंडर उघडून संबंधित ठेकेदाराशी केवळ २५ रुपयांची कपात करून काम मंजूर केल्याचा आरोप संचालकांनी केला. त्यामुळे संस्थेचे अंदाजे २० ते २५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा त्यांनी व्यक्त केला.

याशिवाय, यावर्षी जिनींग व प्रेसिंग युनिट बंद राहिल्यामुळे संस्थेला १२ ते १५ लाख रुपयांचा फटका बसल्याचे सांगण्यात आले. मागील वर्षी हे युनिट सुरू असल्याने १२ लाख १ हजार रुपयांचे उत्पन्न संस्थेला झाले होते. तसेच चार कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने त्यांना ग्रॅच्युइटी व रजा रोखीकरणासाठी १८,९६,८८६ रुपये अदा करण्यात आले, ज्यामुळे संस्थेवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडल्याचेही नमूद करण्यात आले.


बैठकीतील ठरावाबाबतही आक्षेप नोंदवण्यात आला. सभागृहात चर्चेनुसार निर्णय नोंदविण्याऐवजी प्रोसीडिंग बुकमध्ये "सर्वानुमते ठराव" असा उल्लेख करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून, संबंधित ठरावाला आपला स्पष्ट विरोध असल्याचे संचालकांनी सांगितले.

या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून अध्यक्ष व संबंधित जबाबदार पदाधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, तसेच सुरू असलेले बांधकाम तातडीने थांबवावे, अशी मागणी पत्रकार परिषदेतून करण्यात आली. अन्यथा संस्थेच्या हितासाठी सभासदांना विश्वासात घेऊन आंदोलन व उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. सदर प्रकरणामुळे सहकार क्षेत्रात पुन्हा एकदा पारदर्शकतेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, पुढील कार्यवाहीकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## राळेगांवमध्ये छत्रपती महोत्सव

### प्रबोधन व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी



**राळेगांव :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त राळेगांव शहरात तीन दिवसीय छत्रपती महोत्सव आयोजित केला जात आहे. १७ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान शिवतीर्थ राळेगाव येथे हा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे.

यवतमाळ नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा प्रियदर्शनी अशोक उईके कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी वक्तृत्व स्पर्धा आणि सामाजिक प्रबोधन सत्रांचा समावेश असणार आहे. दुसऱ्या दिवशी शालेय विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक स्पर्धा आणि किल्ले स्पर्धेचे आयोजन, तर तिसऱ्या दिवशी रक्तदान शिबिर व भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

कार्यक्रमामध्ये विजेत्यांना आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. विशेषतः, सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शिवकालीन प्रसंग सादर करून सर्वच वयोगटांमध्ये सहभागासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवात आयोजित या महोत्सवात शिवकालीन वारसा व संस्कृतीची जाणीव प्रबोधनात्मक कार्यक्रमांद्वारे केली जाईल.

महोत्सव कार्यक्रमाची रूपरेषा : १७ फेब्रुवारी २०२६ : दुपारी २ वाजता : १६ ते २२ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसे. सायंकाळी ७ वाजता : सप्तखंजेरी वादक पंकज पाल महाराज यांचे सामाजिक प्रबोधन. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता : शालेय विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक स्पर्धा आणि किल्ले स्पर्धा. सायंकाळी : खुली सांस्कृतिक स्पर्धा – शिवकालीन प्रसंग आधारित सादरीकरण. पुरस्कार : ३१ हजार, २१ हजार, १५ हजार रुपये. १९ फेब्रुवारी २०२६ : सकाळी ९ वाजता : अश्वारूढ पुतळ्याचे पूजन. दुपारी ११ वाजता : रक्तदान शिबिर. दुपारी ३ वाजता : भव्य शोभायात्रा व दिंड्यांची स्पर्धा होणार आहे. महोत्सवाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी सर्व नागरिकांना छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती, राळेगाव यांच्या वतीने जाहीर निमंत्रण दिले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि. १५ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




## वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...



# दादागिरी रोजच पुन्हा-पुन्हा, पोलिसांनीच दाखल केला गुन्हा !

### काहीच कारण नसतांना, सिसीटीव्ही कॅमेरे असतांना, पार्कींगचे पैसे देवूनही त्रास विनाकारण

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम रेल्वे स्टेशनवर काहीच कारण नसतांना सिसीटीव्ही कॅमेरे असतांना पार्कीगचे पैसे देवूनही पार्किंगमध्ये ठेकेदाराची दादागिरी दररोज वाढत आहे. या ठेकेदारासोबत रेल्वे अधिकाऱ्यांची भागिदारी असल्यामुळे आपले कोणची काही करू शकत नसल्याने तो मग्रूर ठेकेदार प्रवाशाना अश्लिल भाषेत महिलांसमोरच शिवीगाळ करून मारहाणीची भाषा करतो, या सर्व प्रकाराला वाशीम शहरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. त्याच्या आरेरावीचा व दादागिरीचा पोलिसांना शिवीगाळ केल्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला होता. या सर्व प्रकाराची सर्वप्रथम सिटी न्युज सुपरफास्टने व आरआरसी सिटी न्युज चॅनलने वृत्त लावून धरून पाठपुरावा केला. त्यामुळे पोलिसांनीच या मग्रूर ठेकेदाराविरूध्द गुन्हा दाखल केला असून हा ठेकेदार फरार आहे.

माणुसकी नावाचा काही प्रकार असतो. चांगल्या बोलण्याने वागल्याने माणुस पैशाकडेही पाहत नाही रेल्वे स्टेशनच्या परिसरात गाडी आल्यापासुन मोठ्या आवाजात दादागिरीने बोलुन लोखंडी रॉड घेऊन मारण्याच्याच हेतुने ठेकेदार उभा असतो प्रेमाने काहीच बोलत नाही. घाण घाण शिवीगाळ करत गाडी पार्कींग करा. नाहीतर मारहाण करण्याच्या थेट धमक्या देतो. प्रवाशा सोबत बहुतांशी महिला व मुलीअसतात त्यांनाही न जुमानता मागील पुढील विचार न करता थेट अश्लिल शिवीगाळ करुन मारण्याच्या धमक्या देतो.अनेकांना रॉडने मारहानी केल्याच्या सुध्दा तक्रारी आहेत.प्रेमाने प्रवाशी भिकाऱ्याला व तृतीय पंथ्याला १० रुपयाऐवजी २० रुपये देतात. मात्र हा मगरुर ठेकेदार ६ रुपयाच्या पार्कींगसाठी प्रवाशांवर दादागिरी करतो. त्याला रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची साथ असल्याची चर्चा आहे. वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये अनेक धक्कादायक प्रकार उघडकीस येत आहेत. पार्कींग मधील बाईक घेण्यासाठी आलेल्या युवकासह थेट पोलिसांना पार्किंग ठेकेदाराने अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून या पार्कींग ठेकेदारावर पोलिसांकडून कठोर कारवाई व्हावी अशी मागणी सर्व सत्तरातुन होत आहे.



वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला होत.पार्कींगची पावती नसल्याने बाईक घेण्यासाठी आलेल्या युवकासह थेट पोलिसांना पार्किंग ठेकेदाराने अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झालं होतं.त्यानंतर या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात होतं.तसेच या मुजोर पार्कींग ठेकेदारावर कठोर कारवाईची मागणी सर्व स्तरातून केली जात होती.आता या व्हायरल व्हिडीओची पोलिसांकडून गंभीर दखल घेण्यात आली असून शिविगाळ करणाऱ्या ठेकेदारावर अखेर वाशीम शहर पोलिसात विविध कलमा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आहे.पोलीस या ठेकेदाराचा शोध घेत असून तो फरार झाल्याची माहिती आहे.

## सिटी न्युज सुपरफास्टचा सततचा पाठपुरावा...

### हजारो नागरिकांची धन्यवादाचे फोन

**७ ते ८ वर्षापासून कारण नसतांना पार्कींगचे पैसे देवूनही विनाकारण महिलांसमोर अश्लिल शिवीगाळ करून दादागिरी करणाऱ्या मग्रुर ठेकेदाराला वाशीमचे नागरिक त्रस्त झाले होते. या संबंधिचे सर्वप्रथम सिटी न्युज सुपरफास्टने व आरआरसी न्युजने वृत्त प्रकाशित करून जनतेच्या भावनेला वाचा फोडली. त्यामुळे तीन दिवसापासून दररोज हजारो फोन सिटी न्युज सुपरफास्टला येत असून धन्यवाद देत आहेत. त्यामुळे जनतेच्या न्यायासाठी जनतेसोबत सिटी न्युज सुपरफास्ट कायम सोबत आहे आणि सोबत राहणार आहे.**

## थोडक्यात

### तालुक्यात जिओचे नेटवर्क कोलमडले ;संपर्कासाठी अडचणी !




●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

देश डिजिटल असल्याचा दावा करणाऱ्या जिओ मोबाईलचे नेटवर्क तालुक्यात गेल्या तीन दिवसापासून कोलमडले आहे. त्यामुळे अनेकांचे संपर्क तुटले असून ऑनलाइन व्यवहार ठप्प झाले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये चिडचिड वाढली असून संपर्कासाठी अडचणी येत आहेत.

याकडे कोणी लक्ष देईल का ? असा प्रश्न उपस्थित होते. तालुक्यातील ग्रामीण भागातील शेकडो गावात जिओ कंपनीने आपले नेटवर्क वाढवून प्रत्येक नागरिकांना जिओ मोबाइल कार्ड देऊन त्यांना जिओच्या सेवेत आणले. ग्राहकही जिओच्या विविध प्रलोभनाच्या जाळ्यात अडकले. शहराप्रमाणेच ग्रामीण भागात रिठद,हराळ,चिखली घोटा, या गावात लाखो ग्राहकांच्या मोबाईल मध्ये जिओचे सिम कार्ड आहे. गेल्या तीन दिवसापासून जिओ कंपनीचे नेटवर्क बंद पडल्याने संपर्क साधने कठीण झाले आहे. मुलाचा आईला, आईचा मुलाला, वडीलाचा घरातील एकही व्यक्तीला संपर्क साधला जाऊ शकत नाही. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती चिडचिड करताना दिसत आहे. किराणा, हॉटेल, कपडा मार्केट व इतर ठिकाणी व्यवहार करताना फोन पे चा सर्वाधिक वापर केला जातो. परंतु मोबाईल सेवा ठप्प झाल्याने अनेकांना आर्थिक व्यवहार करणे कठीण झाले आहे. आर्थिक व्यवहार करण्यासाठी बँकेतून रोख रक्कम काढून व्यवहार करावे लागत आहे.

तीन ते चार दिवस होऊनही कंपनीने मोबाईल सेवा सुरळीत करण्यासाठी कोणतेही पाऊल उचललेले नाही. संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांना याबाबत माहिती विचारली असता तुमची तक्रार नोंदवून घेतली आहे. लवकरच उत्तर! असे काहीसे शब्द कानावर पडले की झालं. कोणीही दखल घ्यायला तयार नाही. जिओ मोबाइल सेवा ठप्प झाल्याने अनेक ग्राहकांनी आपला नंबर कायम ठेवून इतर कंपन्याशी संपर्क साधून कंपनी बदलणे सुरू केले आहे.

## आता न्याय व शासकीय योजना सर्वसामान्यांच्या दारात...

# कायद्यासह इतरही ज्ञान प्रत्येकांच्या घरात !

### *विधी सेवा महाशिबीरातून शासकीय योजनांचा थेट लाभ *उच्च न्यायालयाच्या पालक न्यायमूर्तींच्या हस्ते महामेळाव्याचे उद्घाटन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वाशिम, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम व जिल्हा विधीज्ञ संघ वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने दि १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वाटाणे लॉन, अकोला रोड, वाशिम येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला.महाशिबीराचे उद्घाटन उच्च न्यायालय, मुंबईचे न्यायमूर्ती तथा पालक न्यायमूर्ती, वाशिम अभय ज. मंत्री आणि उच्च न्यायालय, मुंबई (नागपूर खंडपीठ)चे न्यायमूर्ती तथा पालक न्यायमूर्ती, वाशिम महेंद्र एम. नेरलीकर यांच्या हस्ते करण्यात आले.





यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम अनिल सुब्रमण्यम, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पीत चौहान, अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर,जिल्हा शल्य चिकित्सक अनिल कावरखे, मुख्याधिकारी निलेश गायकवाड,अध्यक्ष, जिल्हा विधीज्ञ मंडळ, वाशिम अनुप बाकलीवाल यांच्यासह सर्व न्यायिक अधिकारी, जिल्ह्यातील विधीज्ञ मंडळाचे सदस्य, विविध शासकीय विभागांचे अधिकारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.महाशिबीरामध्ये विविध विभागांच्या शासकीय योजनांचे एकूण ३६ स्टॉल्स उभारण्यात आले होते. या स्टॉल्सच्या माध्यमातून नागरिकांना एकूण ५२ शासकीय योजनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी सर्व स्टॉल्सना भेट देऊन योजनांची अंमलबजावणी व लाभ वितरणाची माहिती घेतली. महामेळाव्यात कृषी विभागामार्फत श्रीराम मोरे यांना ट्रॅक्टर व ज्योती घुले यांना हार्वेस्टरचे वितरण करण्यात आले. तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियान अंतर्गत सुलभा राजू रोकडे व अलका घोलप यांना फिरते विक्री केंद्राची गाडी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.याशिवाय जीजाबाई मेंडके यांना विहिरीचा लाभ, संतोष देखने यांना अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत रेशन कार्ड तसेच वैष्णवी मुठाळ यांना अधिवास योजनेचा लाभ देण्यात आला. जिल्हा सामान्य रुग्णालय, वाशिम मार्फत नागरिकांच्या आरोग्य तपासणीसाठी 'मिनी हॉस्पिटल'चा स्वतंत्र स्टॉल लावण्यात आला होता. या ठिकाणी विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या तसेच आरोग्य विभाग व संबंधित यंत्रणांकडून शासनाच्या विविध आरोग्य व कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली.या विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांच्या महामेळाव्याचा लाभ वाशिम जिल्ह्यातील नागरिकांनी घेतला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम व्ही. जी. चौखंडे यांनी केले.विविध विभागांचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सरकार बंजारा समाजाच्या कायम पाठीशी - मुख्यमंत्री

●सिटी न्युज ब्युरो @ मानोरा●

संत सेवालाल महाराज यांनी समाजाला स्वाभिमान, सदाचार आणि सेवाभावाचा मार्ग दाखविला. त्यांचे विचार आजच्या काळात अधिक प्रेरणादायी आहेत. पोहरादेवी हे केवळ श्रद्धेचे केंद्र नसून, सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहे. पर्यटन विकास हा केवळ आर्थिक प्रगतीपुरता मर्यादित नसतो, तर तो स्थानिक संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचे संवर्धन करणारा असतो. पोहरादेवी परिसराचा नियोजनबद्ध विकास करताना श्रद्धेचा सन्मान राखून सुविधा अधिक सक्षम करण्यात येईल. बंजारा समाजाच्या कायम





पाठीशी असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

दूरदृश्यप्रणालीव्दारे संदेश देतांना मुख्यमंत्री श्री.फडणवीस बोलत होते.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, संत सेवालाल महाराज यांचे विचार समाजात समता, बंधुता आणि सेवाभाव रुजवणारे आहेत. पोहरादेवी हे केवळ धार्मिक स्थळ नसून, पर्यटनाच्या दृष्टीनेही मोठी क्षमता असलेले केंद्र आहे. या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी शासन आवश्यक त्या पायाभूत सुविधा, रस्ते, निवास व पर्यटक सुविधांसाठी सातत्याने प्रयत्न करणार आहे.संत सेवालाल महाराज यांचा वारसा जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पोहरादेवीसारख्या तीर्थक्षेत्रांचा विकास झाला, तर स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. शासन विकास आणि सामाजिक समरसतेसाठी कटिबद्ध आहे.पोहरादेवीत उद्योग निर्मितीला चालना देणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केले.या कार्यक्रमाला मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार संजय देशमुख, आमदार धर्मगुरू बाबुसिंग महाराज, आमदार किरण सरनाईक, आ.सई डाहाके, आ.राजेश राठोड , आ.किसन वानखडे, पुसदच्या नगराध्यक्षा मोहिनी नाईक, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, पर्यटन उपसंचालक विजय जाधव, माजी खासदार हरिभाऊ राठोड हे उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे माता जगदंबेच्या चरणी नतमस्तक









●सिटी न्युज ब्युरो @ पोहरादेवी●

श्री. संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सवाच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दि.(१४) रोजी वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील पोहरादेवी येथे भेट देत संत सेवालाल महाराज, संत शिरोमणी रामराव बापू महाराज तसेच माता जगदंबेच्या चरणी नतमस्तक होऊन दर्शन घेतले.

यावेळी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड,आमदार धर्मगुरु बाबु सिंग महाराज, महंत कबीरदास महाराज, महंत जितेंद्र महाराज,महंत शेखर महाराज,महंत सुनील महाराज, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आदींची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संतांच्या विचारांचा समाज घडविण्यात मोलाचा वाटा असल्याचे सांगितले. सत्य, अहिंसा, सेवा आणि सामाजिक समतेचा संदेश संत सेवालाल महाराज व संत रामराव बापू महाराज यांनी दिला असून, त्यांच्या विचारांवर चालत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.पोहरादेवी हे केवळ धार्मिकच नव्हे तर सांस्कृतिक व सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाचे केंद्र असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. पायाभूत सुविधा, रस्ते, निवास व्यवस्था व भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर सकारात्मक पावले उचलली जात असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले केले.कार्यक्रमाच्या वेळी मोठ्या संख्येने भाविक, समाजबांधव व मान्यवर उपस्थित होते. संतांच्या चरणी नतमस्तक होत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यात शांतता, सामाजिक सलोखा व सर्वांगीण विकासासाठी प्रार्थना केली.यावेळी महंत, विश्वस्त व ट्रस्टी देखील उपस्थित होते.

## 'गोहोगाव हाडे गावच्या रस्त्यासाठी दिव्यांगांचा उपोषणाचा एल्गार !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तरीतही ग्रामीण भागातील रस्ते ही विकासापासून कोसोदुर आहेत. त्यातीलच एक सर्वोत्तम नमुना म्हणजे रिसोड तालुक्यातील गोहोगाव हाडे हे गाव या गावाला जाण्यासाठी वाकद ते गोहोगाव या पाच किलोमीटर रस्त्याची पूर्णतः दुर्दशा झाली असून गावकऱ्यांनी अनेक वेळा रस्त्यासाठी शासन दरबारी तसेच लोकप्रतिनिधींकडे मागणी केली मात्र त्यावर कोणताही ठोस निर्णय होऊ शकला नाही.यावर गोहोगाव हाडे येथील निलेश सुरेश हाडे या दिव्यांग नागरिकाने आपल्या गावकऱ्यांच्या रस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागावा यासाठी ता.१२ फेब्रुवारी पासून गोहोगाव येथील संत गजानन महाराज मंदिरासमोर आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.



*शासनाचा दूजाभाव, लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष'
*आमरण उपोषणाला सुरुवात

तालुक्यातील गोहोगाव हाडे हे गाव काच नदी पात्राचा वेढा येणारे गाव या गावाला मागील अनेक वर्षांपासून तालुक्याला जोडणारा गोहोगाव हाडे ते वाकद हा पाच किलोमीटर अंतराचा रस्ता अत्यंत खराब झाल्याने सदर रस्त्याने चारचाकी गाडी चालवणे सोडा दुचाकी ही चालवणे कठीण झाले आहे. याच रस्त्याने गावकऱ्यांना दळणवळण करणे कठीण झाले आहे.तसेच शाळेतील लहान मुलांना शाळेत जाताना मोठा त्रास सहन करावा लागतो. शिवाय कुठलीही शासनाची बस या गावात येत नाही.त्याच बरोबर गावातील गर्भवती स्त्रिया, दिव्यांग नागरिकांना देखील मरत यातना सहन कराव्या लागतात.त्यामुळेच गावचा रस्ता डांबरीकरण व्हावा यासाठी दिव्यांग नागरिक निलेश हाडे यांनी आमरण उपोषणाचा शस्त्र अंगिकारले आहे.

गोहोगाव हाडे ते वाकद हा आमच्या गावचा तालुक्याला जोडणारा पाच किलो मीटर अंतराचा रस्ता अनेक वर्षांपासून दुर्लक्षित आहे.आमच्या गावकऱ्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. निवडणुका आल्या की सर्वच राजकीय पुढारी आश्वासनाची खैरात करतात. मात्र त्यावर पुढे काहीच निर्णय घेतल्या जात नाही. यावर व्यथित होऊन मुक्या बहिऱ्याचे सोंग घेतलेल्या शासन,प्रशासनाला जागे करण्यासाठी मी आमरण उपोषणास बसलो आहे. कोणत्याही परिस्थित आमच्या गावचा रस्त्याचा प्रश्न मार्गी लागल्या शिवाय आता माघार घेणार नाही.

**निलेश सुरेश हाडे**, दिव्यांग नागरिक उपोषणकर्ता गोहोगाव हाडे

आमच्या गावाला जोडणारा रस्त्याची पूर्णतः चाळण झाली असून मागील वीस वर्षांपासून अद्यापही आमची रस्त्याची समस्या सुटलेली नाही. पावसाळ्यात आमच्या गावाला पाण्याचा वेढा येतो. त्यामुळे रस्ता अधिकच खराब झाला आहे.अनेकाना रस्ता खराब असल्याने वेळीच उपचार मिळाला नसल्याने आपला जीव गमवावा लागला आहे.

**उत्तमराव नरवाडे**
ग्रामस्थ गोहोगाव हाड

गोहोगाव हाडे ते वाकद या रस्त्याचे नूतनीकरण व्हावे यासाठी आम्ही हा रस्ता अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रस्तावित केला आहे.तसेच आमचा वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.लवकरच शासनाकडून मंजुरात आली की आम्ही सदर रस्त्याचे काम सुरू करणार आहोत.

**अझीम शेख,** उप अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग रिसोड

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# हर हर महादेवाच्या गजराने दुमदुमली राजराजेश्वर नगरी

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोला :** सकाळी मंदिरातून निघाली राजराजेश्वर महाराजांची पालखी. महाशिवरात्रीला भोलेनाथाच्या दर्शन घेण्याकरिता भाविकांची मोठी गर्दी होती. ठिकठिकाणी फळ वाटप व विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहत पार पडले. शहरातील ग्रामदैवत श्री राजराजेश्वराची पालखी निघाली.

श्री राजेश्वर मंदिरातून पालखी किल्ला, पोळा चौक, भावसार चौक, वाल्मिक चौक, रमेशनगर चौक, गाड़गेबाबा आखाड़ा, नागोबा मंदिर गल्ली, शितला माता मंदिर, जयहिंद चौक, दगडी पूल, खत्री मिठाई, शहर कोतवाली, मोठे पूल, जयहिंद चौक वरून रात्री श्री राज



राजेश्वर महाराजांची पालखी मंदिरात पोहोचते. महाआरतीने सोहळ्याची सांगता होते. सकाळी पालखी सोहळ्याच्या वेळी मंदिराचे विश्वस्त, पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील यांनी पालखीचे पूजन करून दर्शन घेतले. त्यानंतर मंदिरातून पालखी निघाली. यावेळी महिला पुरुष व लहान मुलांची उपस्थिती होती. राजराजेश्वर महाराज की जय, नमः पार्वती पतये हर हर महादेव अशा घोषणा देण्यात आल्या. राजराजेश्वर महाराज मंदिरचे अध्यक्ष ॲड. रामेश्वर ठाकरे, विश्वस्त नरेश लोहिया, ॲड. राम भौरदकर, गजानन घोंगे, सुधीर अभ्यंकर, ॲड. गिरीश देशपांडे यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम झाले.

# राजराजेश्वर मंदिरात विवाहाची लगबग

♦ महाशिवरात्रीला शिव पार्वती विवाह सोहळा

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोला :** शहराचे ग्रामदैवत श्री राजराजेश्वर मंदिरात शनिवार पासून शिव पार्वती विवाह सोहळ्याची लगबग दिसून आली. हळदीचा कार्यक्रम झाला. तसेच विवाहापूर्वीचे विधी यथासांग पार पडले. भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. रात्री उशिरापर्यंत भाविकांनी राजराजेश्वराचे दर्शन घेतले. राजराजेश्वराला फेटा बांधून सुंदर आरास करण्यात आली होती.

महाशिवरात्री साठी राजराजेश्वर मंदिरावर रोषणाई करण्यात आली आहे. संपूर्ण परिसर झगमगतो आहे. आज महाशिवरात्री. शिव पार्वती विवाह सोहळा साजरा



होणार. सायंकाळी वरात आणि विवाह होईल. आजही रात्री राजराजेश्वर मंदिर भाविकांसाठी उघडे राहणार आहे. रात्री उशिरापर्यंत भाविक राजराजेश्वराला अभिषेक करतात. हजारो भाविक दर्शनासाठी येणार असल्यामुळे मंदिराच्या व्यवस्थापनाने सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. आज उपवास असल्याने भाविकांना उसळ वाटप करण्यात येते. शनिवारी रात्री पासून प्रसादाची तयारी सुरु झाली होती. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस बंदोबस्त राहणार आहे. सर्वांनी शांततेत दर्शन घ्यावे असे आवाहन करण्यात आले आहे.



# पुण्याला जाणाऱ्या स्लीपर बसच्या चालकाचे प्रवासात मद्यप्राशन

♦ खामगाव बसस्थानकात घातला धिंगाणा प्रवाशांना नाहक त्रास

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**खामगाव :** बसस्थानकात घातला धिंगाणा प्रवाशांना नाहक त्रास

अकोला. परतवाडा येथून पुणेकडे जाणाऱ्या 'स्लीपर' बसच्या दोन्ही चालकांनी ड्युटीवर असताना मद्य प्राशन केल्याचे आढळून आले. केवळ दारू प्राशन केली नाही तर या दोघांनी खामगाव बस आगारात धिंगाणा घातला. या दोघांवर वरिष्ठ कारवाई करणार की असाच धिंगाणा घालण्याची सूट दिली जाईल असे प्रवासी बोलत होते इतकेच नव्हे तर



या घटनेचे वार्तांकन करणाऱ्या प्रसिद्ध माध्यमाच्या प्रतिनिधीसोबत त्यांनी अभद्र व्यवहार केला. यामुळे एसटी महामंडळाच्या बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दोन तास खामगाव बस स्थानकात रखडत बसावे लागले. मद्यधुंद चालकांनी दोन तास प्रवाशांना वेठीस धरल्याने त्यांचे बेहाल झाले. बसचे वेळापत्रक कोलमडल्याने बस खामगाव बस स्थानक येथून सुमारे दोन तास उशिरा रवाना झाली. पुणे येथेही बस उशिरा पोहोचल्याने नोकरदार वर्गाची गैरसोय झाली. बस पोहचे पर्यंत प्रवाशांचा जीव टांगणीला लागला होता.

# बागडे चौकात महाशिवरात्रीनिमित्त शिव आराधना



प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोला :** राजपूतपू-यातील बागडे चौकात महाशिवरात्रीनिमित्त शिवाचा सुंदर देखावा तयार करण्यात आला होता. शिवम अण्णा मिरजामले मित्र परिवार कडून १५ वर्षापासून कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. या भागातील युवकांचा सहभाग असतो. आज सायंकाळी महाआरती होऊन उसळीचे वाटप करण्यात येईल.

यावेळी शिवम अण्णा मिरजामले, रवी अग्रवाल, आकाश कोमले, तनीश शर्मा, सचिन दुबे, करण ठाकूर, गोविंद अण्णा मिरजामले, दिलीपसिंग चंदेल, रितेश गुरले, चेतन राजपूत, दुर्गेश कांतेकर, गोपाल कोलपेकर, अभिनव मिरजामले, विशाल वाघमारे, सनी शर्मा उपस्थित होते. बागडे चौकात देखावा येणाऱ्या जाणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे.

# बोर्डी शेतशिवारात बिबटच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

**अकोट :** अकोट तालुक्यातील नरनाळा अभयारण्यात सातपुड्यात वसलेले आदिवासी पुनर्वसित भाग शहापूर रूपागड शहानुर मार्डी पोपटखेड बोर्डी या पहाडपट्टी भागात रविवार दि. १४ सायंकाळी शेतमजूर शेतातून घरी परत येत असताना शहापूर रूपा गड गावालगत असलेल्या रोडला लागून शेतात पट्टेदार वाघाने गाडीमध्ये बसलेल्या शेतमजुरांना साक्षात दर्शन दिले तर बोर्डी येथे रविवार दि.१४ ला भर दिवसा शेतात बोर्डी गावातील शेतकरी निलेश शांताराम महाले हे शेतात गव्हाच्या पिकाला पाणी देत असताना, एका वन्यप्राण्याने त्यांच्यावर अचानक हल्ला केल्याची घटना घडली.

# बिर्ला कॉलनीत शिव मंदिराची सजावट

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोला :** बिर्ला कॉलनीत शिव मंदिरात महाशिवरात्री सोहळा हर्षोल्हास आणि भक्ती भावाने साजरा केला जात आहे. शिवाला अभिषेक करून भाविक मोठ्या संख्येने दर्शन घेत आहेत. महाशिवरात्री साठी नागपूर येथून गुलाबाच्या फुलांचे मोठे हार महादेवाला घालण्यात आले होते.

संपूर्ण परिसर पताकांनी सजवण्यात आला आहे. मंगलध्वनी वातावरणात भक्तीलहरी पसरवीत आहे. अतिशय



आल्हाददायक वातावरण याठिकाणी आहे. दोन तीन दिवसांपासून विविध उपक्रम राबवले जात आहेत.

# तेल्हारा शहरात एकाच रात्री तीन दुकानांत चोरी

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**तेल्हारा :** शहरात काल मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी तीन वेगवेगळ्या दुकानांचे शटर फोडून चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकारात अंदाजे दीड लाख रुपयांची रोकड चोरीस गेल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

मिळालेल्या माहितीनुसार टायरचे दुकान, पान टपरी आणि अंड्याचे दुकान यांना चोरट्यांनी लक्ष्य केले. सकाळी दुकानदारांनी दुकान उघडण्यासाठी येताच शटर व कुलूप तोडलेले दिसून आले. घटनेची माहिती तत्काळ पोलिसांना देण्यात आली. घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. स्वान पथकाद्वारे परिसरात तपासणी करण्यात आली असून चोरट्यांचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच फोरेन्सिक टीमने घटनास्थळी भेट देऊन ठसे व अन्य पुरावे संकलित केले. या घटनेमुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

# राष्ट्रीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेत क्रीडा प्रबोधिनी अकोल्याचा रवींद्र पाडवी देशात प्रथम

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोला :** स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया, डिपार्टमेंट ऑफ स्कूल एज्युकेशन प्री युनिव्हर्सिटी बंगळूरू व डिपार्टमेंट ऑफ स्कूल एज्युकेशन (प्री युनिव्हर्सिटी) बंगळूरू नॉर्थ डिस्ट्रिक्ट तर्फे आयोजित ६९ वी नॅशनल बॉक्सिंग चॅम्पियनशिप बेंगलुरु येथे राष्ट्रीय शालेय बॉक्सिंग चॅम्पियनशिप मध्ये क्रीडा प्रबोधिनी अकोल्याचा रवींद्र पाडवी देशात प्रथम आला.

६९ वी राष्ट्रीय शालेय बॉक्सिंग चॅम्पियनशिप बेंगलुरु कर्नाटक येथे संपन्न झालेल्या स्पर्धेत ४९ ते ५२ किलो वजनगटात बॉक्सिंग खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करित सुवर्ण पदक प्राप्त केले.

रवींद्र पाडवी अंतरराष्ट्रीय स्पर्धेपूर्व शिबीरात सहभाग घेतलेला आहे. रवींद्र पाडवी




याला जिल्हा क्रीडा अधिकारी अकोला तसेच आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग कोच मा. सतीशचंद्र भट्ट सरांचे मार्गदर्शन लाभले.

त्याच्या या यशाबद्दल अकोला जिल्ह्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी सतीश्चंद्र भट्ट यांनी त्याचे अभिनंदन केले.

# ऑटोक्रेट कोचिंग क्लासमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप

♦ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा सन्मानपूर्वक गौरव करणे हा उद्देश

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोला :** येथील ऑटोक्रॅट कोचिंग क्लास मध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी साध्या पण गरिमामय वातावरणात निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा सन्मानपूर्वक गौरव करणे तसेच त्यांना आगामी बोर्ड परीक्षा आणि भविष्यातील आव्हानांसाठी प्रेरित करणे हा होता.

निरोप समारंभ प्रसंगी विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये आत्मीय संवादाचे वातावरण पाहायला मिळाले. अनेक विद्यार्थ्यांनी आपले अनुभव व्यक्त करताना सांगितले की, संस्थेमध्ये शिक्षणासोबतच शिस्त, आत्मविश्वास आणि ध्येयाप्रती बांधिलकी यांचेही मौल्यवान धडे त्यांना मिळाले. मागील



चार वर्षांपासून एकत्र शिक्षण घेत असलेल्या या विद्यार्थ्यांसाठी हा क्षण अत्यंत भावनिक ठरला. अनेक विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत निरोपाच्या क्षणी अश्रू तरळताना दिसले.

संस्थेचे संचालक शारिक डोकडिया यांनी मनोगतात सांगितले की, विद्यार्थ्यांचे यश हे त्यांच्या मेहनतीबरोबरच शिक्षकांच्या समर्पणामुळे आणि पालकांच्या सहकार्यामुळेच शक्य होते. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना आगामी परीक्षांसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देत आत्मविश्वासाने पुढे वाटचाल करण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त करण्यात आल्या. संपूर्ण समारंभ शांत, प्रेरणादायी आणि संस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.

# पुसद–उमरखेडमध्ये एटीएसची धाड; अनेक ठिकाणी सर्च ऑपरेशन

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**यवतमाळ :** पुसद शहरात रविवारी मध्यरात्रीनंतर अचानक दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) अकोला यांनी धाड टाकली. सायरन नसलेल्या वाहनांचे ताफे, वेगवेगळ्या भागांत फिरणारे अधिकारी आणि वाढविण्यात आलेला कडेकोट बंदोबस्त यामुळे शहरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) अकोला येथून मोठ्या संख्येने पुसदमध्ये दाखल झाले. पार्वतीनगर परिसरासह विविध भागांत एकाच वेळी छापेमारी सुरू करण्यात आली. सुमारे ५ ते ६ डीवायएसपी दर्जाचे अधिकारी, विशेष पथकाचे कर्मचारी आणि मोठा पोलीस ताफा शहरात तैनात करण्यात आल्याची माहिती आहे. पुसदमध्ये तब्बल



१२ ते १४ ठिकाणी तपास व चौकशी सुरू असून ज्या ठिकाणी धाड टाकण्यात आली आहे त्या परिसरांना सील करण्यात आले आहे. कारवाई अत्यंत गोपनीय पद्धतीने सुरू असल्याने अधिकृत माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

दरम्यान, उमरखेड येथेही अशाच प्रकारची कारवाई सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी संबंधित ठिकाणी भेट दिल्याचे समजते.

काही संशयितांवर दहशतवादी संघटनांशी संपर्क ठेवून तरुणांना सक्रिय करण्याच्या हालचालींचा तपास सुरू असल्याची चर्चा असून, माजी सिमी कार्यकर्त्यांच्या हालचालींच्या अनुषंगाने हे सर्च ऑपरेशन असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. मात्र, याबाबत अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. दरम्यान, शहरात या कारवाईची जोरदार चर्चा सुरू असून नेमकी कारवाई कोणत्या प्रकरणात आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# १९ वर्षीय तरुणीचे अपहरण पालकांचा गंभीर आरोप

♦ पोलिसांनी दाखल केली मिसिंगची तक्रार

प्रतिनिधी १५ फेब्रुवारी

**अकोला :** जिल्ह्यातील दहीहांडा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या करतवाडी रेल्वे येथील एक १९ वर्षीय तरुणी रहस्यमयरीत्या बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी 'हरवलेली व्यक्ती' म्हणून नोंद केली असून तपास सुरू केला आहे. आम्ही पोलिसांना वारंवार सांगत आहोत की आमची मुलगी पळवून नेल्या गेली. तरी देखील पोलिस दखल घेत नसल्याची ओरड तरुणींच्या आईने केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १३ फेब्रुवारी २०२६ च्या मध्यरात्री २:०० वाजेच्या सुमारास या १९ वर्षीय तरुणीला पळवून नेले गेले. कुटुंबाने गाव आणि नातेवाईकांकडे शोध घेतला, मात्र ती कोठेही मिळून आली नाही. अखेर तिची आईने दहीहांडा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. पण, पोलिस त्यांच्या मुलीचा शोध घेत नसल्याची ओरड मातेने केली आहे. आपली मुलगी मिसिंग नाही तर तिचे अपहरण झाले आहे असा आईचा दावा आहे. पण, पोलिस मिसिंगची तक्रार दाखल करत चौकशी करत नसल्याची ओरड मुलीच्या आईने केली आहे. कोणाला या तरुणीबद्दल काही माहिती मिळाल्यास त्यांनी तात्काळ दहीहांडा पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन दहिहांडा पोलिसांनी केले आहे.

वाढदिवस शुभेच्छा



पश्चिम विदर्भातील सर्वाधिक लोकप्रिय चॅनल आरआरसी नेटवर्क व सिटी न्यूज सुपरफास्टचे प्रतिनिधी

सुरेश राठोड

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

RRC NETWORK

सिटी न्यूज सुपरफास्ट

CLASSIFIED

कंपनी काम के लिय अनुभवी सेल्समन चाहिये

-:संपर्क:-

सियाराम मार्केटिंग
होमअप्लांर्स गिफ्ट आर्टिकल
चित्रा टॉकीज के पास अमरावती

हमारे यह शादी, बर्थडे एवम सभी प्रसंग के लिय ठोक भाव रिटन गिफ्ट मिलते है!
9422956859
9422733033
9657901854

भाड्याने देणे आहे

चार रुमचे स्वतंत्र घर १६०० स्क्वे. फुट वरील बांधकाम सरकारी, निम सरकारी, वित्तिय संस्था, पॅथॉलॉजी, ब्लड बँक, फिजिओ थेरपीस्ट, कोचिंग क्लास करिता

भाड्याने देणे आहे

पत्ता: गोरक्षण रोड विभागात, अकोला
9421438098
9822361001

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK